
संत गाडगेबाबा पुतळा
यांचे स्मरणार्थ
भोंगाळे बंधू
यांचेकडून ग्रामस्वच्छता अभियानास भेट
ता.५/५/२००४.

**श्री संत गाडगेबाबा**

# प्रकरण पहिले

## संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचे स्वरूप

# प्रकरण पहिले

# 'संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचे स्वरूप'

## (Nature of Sant Gadgebaba Gram Swachhata Abhiyan)

**प्रस्तावना :**

ग्रामीण पाणीपुरवठा आणि सार्वजनिक स्वच्छता हे सामाजिक आणि पर्यावरणीय दृष्टीकोणातून महत्त्वपूर्ण असे समकालीन विषय आहेत. विकास आणि मानवी आरोग्य या दोन्ही दृष्टींनी पाणीपुरवठा आणि सार्वजनिक स्वच्छता या विषयांचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. पाणी, स्वच्छता, आरोग्य आणि मानवी स्वास्थ्य यात थेट परस्पर संबंध आहेत. मानवी विष्ठेची अयोग्य विल्हेवाट, दूषित पाणी, व्यक्तिगत आणि अन्न घटकांच्या स्वच्छतेकडे होणारे दुर्लक्ष आणि द्रव आणि घनरूप कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली न जाणे या बाबी विकसनशील देशातील अनेक रोगांना जबाबदार असणारी महत्त्वपूर्ण कारणे आहेत. त्यामुळे सार्वजनिक स्वच्छता हा पर्यावरण संरक्षणातील एक महत्त्वाचा मुद्दा बनला आहे, असे ढाका येथे सार्वजनिक स्वच्छतेविषयी झालेल्या परिषदेत सादर करण्यात आलेल्या भारताविषयीच्या संशोधनपर लेखात नमूद करण्यात आले आहे. (GOI : 2003:1). या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचे स्वरूप आणि त्याचा ग्रामीण पर्यावरणावरील प्रभाव यांचे अध्ययन करणे महत्त्वपूर्ण ठरावे.

प्रस्तुत प्रकरणात दोन विभाग असून पहिल्या विभागात भारतातील आणि महाराष्ट्रातील पाणीपुरवठा आणि सार्वजनिक स्वच्छताविषयक परिस्थितीचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे. तर दुसऱ्या विभागात संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची रूपरेषा स्पष्ट करण्यात आली आहे.

### अ) भारतातील आणि महाराष्ट्रातील पाणीपुरवठा आणि सार्वजनिक स्वच्छताविषयक परिस्थितीचा थोडक्यात आढावा

प्रस्तुत प्रकरणाच्या या विभागात भारतातील आणि महाराष्ट्रातील पाणीपुरवठा

आणि सार्वजनिक स्वच्छताविषयक परिस्थितीचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे.

प्रथम आपण भारतातील स्थितीचा आढावा घेऊ.

## १) भारतातील पाणीपुरवठा व सार्वजनिक स्वच्छताविषयक स्थितीचा आढावा

भारतात ख्रिस्तपूर्व सुमारे ३००० वर्षापूर्वीपासून (३००० बी.सी.) सार्वजनिक स्वच्छता हा शहर नियोजनाचा एक भाग असल्याचे दिसून येते. माहोंजोदारो आणि हरप्पा येथील उत्खननातून शहरांचे जे अवशेष दिसून आले त्यावरून त्या काळात रस्ते आणि गटारे या बाबींना महत्त्व दिले जात होते असे दिसून येते. तथापि, नंतरच्या काळात शहरे वाढत गेली पण सार्वजनिक स्वच्छतेकडे मात्र तितकेसे काटेकोरपणे लक्ष न दिले गेल्याचे दिसून येते. ग्रामीण भागात मात्र पूर्वीपासूनच लोक उघड्यावर शौचविधी उरकत आले आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळात शासनाने पाणी-पुरवठा आणि स्वच्छतेच्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले आहेत. भारत सरकारने नेमलेल्या 'एन्व्हायरनमेंटल हायजिन कमिटीने' (१९४८-४९) स्वातंत्र्यानंतर ४० वर्षाच्या काळात ९०% लोकसंख्येला पाणीपुरवठा आणि स्वच्छताविषयक सोयी-सुविधा पुरविण्यासाठी एका समग्र योजनेची शिफारस केली होती. राष्ट्रीय पाणीपुरवठा आणि स्वच्छता कार्यक्रमही सुरू केला. विविध पंचवार्षिक योजनाकाळात उत्तरोत्तर अधिकाधिक अर्थसहाय्य उपलब्ध करूनही या क्षेत्रातील यश मात्र फारसे समाधानकारक राहिले नाही. पाचव्या योजनाकाळात ग्रामीण पाणी-पुरवठ्याची बाब 'मिनिमम नीड प्रोग्रॅम' खाली आणण्यात आली. पिण्याच्या पाण्याचा एकही सुरक्षित स्त्रोत उपलब्ध नसणारी, पाण्याचे दुर्भिक्ष्य असणारी गावे शोधण्यात आली. सहाव्या योजनेत (१९८०-८५) पाण्याचे दुर्भिक्ष्य असणाऱ्या २.३२ लाख गावांपैकी १.९२ लाख गावांना किमान एक तरी सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत उपलब्ध करून देण्यात आला.

१९८१-१९९० ही दहा वर्षे 'आंतरराष्ट्रीय पाणी-पुरवठा आणि स्वच्छता दशक'

म्हणून जाहीर झाले. भारतात १ एप्रिल १९८१ ते ३१ मार्च १९९१ हा काळ आंतरराष्ट्रीय पाणीपुरवठा आणि स्वच्छता दशक म्हणून जाहीर झाला. या दशकाच्या प्रारंभी भारतात नागरी भागातील ७७% आणि ग्रामीण भागातील ३१% लोकसंख्येला सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा उपलब्ध होता. पण स्वच्छतेच्या बाबतीत मात्र परिस्थिती अत्यंत निराशाजनक होती. नागरी भागातील फक्त २७% लोकसंख्येला तर ग्रामीण भागातील केवळ ०.५% लोकसंख्येला स्वच्छताविषयक सोयी उपलब्ध होत्या. (चक्रवर्ती १९९१ : २-४)

भारत सरकारच्या नियोजन आयोगाने तयार केलेल्या अहवालात (२००२) असे म्हटले आहे की, ग्रामीण भारतातील सुमारे ६९ ते ७४% लोकसंख्येला सुरक्षित पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत उपलब्ध आहेत, आणि सुमारे २६ ते ३१% लोकसंख्या अजुनही पिण्याच्या पाण्याच्या सुरक्षित स्त्रोतांपासून वंचित आहे. नागरी भागातील सुमारे ९१ ते ९३% लोकसंख्येला पिण्याच्या पाण्याचे सुरक्षित स्त्रोत उपलब्ध आहेत तर सुमारे ७ ते ९% शहरी लोकसंख्या त्यापासून अजूनही वंचित आहे. सदर अहवालात (२००२) दिलेली स्वच्छताविषयक सोयींची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे. नागरी भागातील सुमारे ७५ ते ८१% घरांना घरगुती शौचालये उपलब्ध आहेत. तर ग्रामीण भागातील सुमारे १८ ते १९% घरांनाच घरगुती शौचालये उपलब्ध आहेत.

सन २००३ च्या भारताविषयीच्या निबंधात, २००१ च्या जनगणना अहवालानुसार उपलब्ध असलेली, स्वच्छताविषयक सोयींच्या उपलब्धतेविषयीची अलीकडील आकडेवारी दिली आहे. त्यानुसार, ग्रामीण भागातील सुमारे २२% घरांना घरगुती शौचालये उपलब्ध आहेत. म्हणजे स्वच्छतेच्या बाबतीत ग्रामीण भारतातील परिस्थिती अत्यंत निराशाजनक असून अजुनही सुमारे ७८% घरातील ग्रामीण भागातील लोक उघड्यावरच शौचविधी उरकतात असे आकडेवारीवरून सूचित होते.

२००२ च्या नियोजन आयोगाच्या अहवालात नमूद केले आहे की, पूर्ण शासकीय नियंत्रण असलेली केंद्रीकरण झालेली आणि पुरवठा आधारित धोरणे बदलून ती विकेंद्रीत,

लोककेंद्री आणि मागणीस-संवेदनशील बनवावी लागतील, अशी जाणीव वाढल्यामुळे पाणीपुरवठा व स्वच्छतेच्या क्षेत्रात १९९९ पासून केंद्रीय पातळीवर धोरणात्मक बदल करण्यात आला. संपूर्ण स्वच्छता मोहिमेत (टीएससी) ह्या धोरणात्मक बदलाचे प्रतिबिंब पडलेले दिसून येते. असाच धोरणात्मक बदल महाराष्ट्र राज्यात देखील दिसून येतो.

थोडक्यात, शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात सुरक्षित पाणीपुरवठा व स्वच्छता याबाबतची परिस्थिती अत्यंत असमाधानकारक आहे, असे वरील विवेचनावरून लक्षात येईल. सापेक्षत: पाणी पुरवठ्याची स्थिती कांहीशी चांगली असली तरी शौचालयांची उपलब्धता आणि त्यांचा वापर याबाबत ग्रामीण भारतात कमालीचे निराशाजनक चित्र दिसते. पाणीपुरवठा व स्वच्छताविषयक सोयी-सुविधा पुरविण्याची प्राथमिक जबाबदारी राज्य शासनाची आहे. म्हणूनच महाराष्ट्र राज्यातील पाणीपुरवठा व स्वच्छताविषयक स्थितीचा थोडक्यात आढावा यापुढील भागात घेण्यात आला आहे. पाणीपुरवठा व स्वच्छताविषयक महाराष्ट्रातील स्थिती, केंद्र आणि राज्य पातळीवर बदललेले नवे धोरण या पार्श्वभूमीवरच आपल्याला महाराष्ट्र राज्याच्या संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचे स्वरूप समजावून घ्यावे लागले.

## २) महाराष्ट्रातील पाणीपुरवठा आणि सार्वजनिक स्वच्छताविषयक परिस्थितीचा थोडक्यात आढावा :

महाराष्ट्र शासनाने 'शुद्ध पाणी आणि स्वच्छ गाव' या योजनेसाठी सन १९६० पासून भरपूर निधी खर्च केला आहे. ग्रामीण पाणीपुरवठा योजनांसाठी आजवर महाराष्ट्र शासनाच्या 'जलस्वराज्य' या पुस्तिकेत दिलेल्या आकडेवारीनुसार रु. १६,६०० कोटी खर्च करण्यात आले. ग्रामीण स्वच्छता योजनांसाठी आजवर रु. ५५० कोटी खर्च करण्यात आले. पण त्यामुळे ग्रामीण जनतेचा पाणीपुरवठा व स्वच्छतेचा प्रश्न अजुनही समाधानकारकरित्या सुटलेला नाही.

पाणी टंचाईच्या समस्येबाबत 'जलस्वराज्य' पुस्तिकेत अशी नोंद आहे की, २८,५०० ग्रामपंचायतीतील ८६,६८१ मनुष्यवस्त्यांपैकी २५,५०० वस्त्यांना पुरेसे पाणी

(४० लि. प्रतिदिन प्रति व्यक्ती) मिळत नाही. सरासरी २०,००० वस्त्यांना दरसाल पाणी टंचाईची झळ पोहचते. दरवर्षी सरासरी ५५०० वस्त्यांना टँकरने पाणीपुरवठा होतो. दरवर्षी टंचाईच्या तात्पुरत्या उपाययोजनांवर सरासरी रु. १०० कोटी खर्च होतो.

सन १९६०-१९९६ : राज्यातील ९६.२५ लक्ष ग्रामीण कुटुंबापैकी १९९६ पर्यंत केवळ ६ लक्ष कुटुंबाकडे शौचालये होती. शौचालय सुविधेअभावी महिलांची कुचंबणा, प्रदूषण, ग्रामीण परिसर व त्यांचे जनतेच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतात.

सन १९९७-२००० : व्यक्तिगत शौचालय योजनेवर भर दिला. मोठ्या प्रमाणावर शासकीय अनुदान मिळाले. १६.६१ लक्ष शौचालयांची निर्मिती (पुरवठा आधारित) झाली. मात्र लोकसहभागाअभावी शौचालयांचा अयोग्य वापर होऊ लागला व स्वच्छतेत भरीव सुधारणा झाली नाही.

पाणीपुरवठा आणि स्वच्छतेशी संबंधित निर्माण केलेल्या साधनसामुग्रींच्या देखभालीसाठी दरवर्षी किमान रु. ८०० कोटी इतका खर्च आवश्यक आहे. पाणीपट्टी आकारणी रु. २०० कोटी इतकी होते, तर वसुली केवळ रु. १२० कोटी होते. म्हणजे राज्यातील ५.५७ कोटी ग्रामीण जनता दररोज दरडोई ४० लि. शुद्ध पाणी मिळविण्यासाठी केवळ ६ पैसे देते. ५ जणांचे एक कुटुंब २०० लि. पाण्यासाठी केवळ ३० पैसे देते म्हणजे शासनाने उपलब्ध केलेल्या १ लि. ला. ०.१५ पैसे तर बिसलेरी पाण्यासाठी मात्र १ लिटरला रु. १० आम्ही सहज देतो, असे का?

समस्येची कारणमीमांसा करताना पुस्तिकेत असे मत नोंदविले आहे की, सर्वच बाबतीत शासनावर अवलंबून राहण्याची जनमानसात रुजवलेली व रुजलेली सवय हे सर्व अनर्थाचे मूळ म्हणता येईल. अर्थात ही सवय लावण्यात आपण सर्वच प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे जबाबदार आहोत. सन १९६० पूर्वी ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासाठी शासन हस्तक्षेप अगदी कमी होता. तो सुद्धा साधी विहिर, रहाट, खिराडी अशा साध्या उपाययोजनांपुरता आणि 'एक गाव एक पाणवठा' या सामाजिक जाणीवेपुरता मर्यादित होता.

त्यानंतर शासनाचे पुरवठा आधारित कार्यक्रम सुरू झाले. पाण्यापेक्षा भव्य दिव्य तंत्रज्ञानावर भर दिला गेला. मिळेल तेथून पाणी उपसा किंवा दूरवरून ओढून आणा. जेवढी मोठी योजना, जेवढा जास्त खर्च तेवढी लोकांची जास्त सेवा अशी भावनात्मक स्पर्धा सुरू झाली. या स्पर्धेत सर्वांनीच सहभाग घेतला. पाणी देणाऱ्यांनी मग ते शासन, प्रशासन, राजकीय नेतृत्व, स्थानिक नेतृत्व, तंत्रज्ञ असोत की, ज्यांना पाणी द्यायचे ते ग्रामस्थ, ग्रामस्तरीय यंत्रणा किंवा ग्रामस्तरीय लोकनेते असोत. त्यात मुख्यत्वाने ज्या जनतेसाठी पाणी द्यायचे त्यांच्या लोकसहभागाचा अभाव असल्याने 'योजना शासनाची आमची नाही', अशीच जनतेची भावना राहिली. पुरवठा आधारित योजना राबविताना योजना महत्त्वाची नसून पाणी महत्त्वाचे आणि यासाठी आवश्यक स्त्रोत बळकटी करण्याकडे दुर्लक्ष होवून, पुर्नभरण बाजूला ठेवून, पुर्न:वापर डावलून प्रत्येकवेळी नवीन योजना तयार करण्यात आल्या. मागच्या वर्षी खोदलेले बोअर पुढच्या वर्षी बाद. शासनप्रणित पुरवठा आधारित धोरण हे शासनाचा पुढाकार आणि लोकांना सेवा पुरवठा एवढ्यापुरतेच मर्यादित राहिले.

२७ जुलै २००० या दिवशी धोरण बदलले. जुन्या पुरवठा आधारित धोरणाला (Supply driven Policy) सोडचिठ्ठी देऊन लोकसहभागावर आधारित कार्यक्रम आखण्यात यावेत. असे नवे धोरण ठरविण्यात आले. या धोरणात ग्रामपंचायत ही केंद्रबिंदू तर ग्रामसभा केंद्रस्थानी असेल. सुविधा निवड, तंत्रज्ञान निवड, निधी वापर इ. सर्व गोष्टी ग्रामपंचायत व गावाच्या मताने लोकांनीच ठरवायच्या आहेत. हे सर्व करत असताना सर्व ग्रामस्थांमध्ये स्वमालकीची जाणीव होण्यासाठी लोकवर्गणीची संकल्पना आली. ग्रामस्थांनी ग्रामस्थांच्या मागणीनुसार आवश्यक पाणीपुरवठा व स्वच्छता सुविधांचे नियोजन व अंमलबजावणी करायची. यामध्ये शासनाचा सहभाग फक्त तांत्रिक सहाय्य पुरविणे, निधी उपलब्ध करून देणे व ग्रामस्थांनी मागितलेले इतर सहकार्य यापुरता राहणार आहे. कार्यक्रमाची अंमलबजावणी ग्रामसभेत ग्रामस्थांनी नियुक्त केलेल्या ग्रामपंचायतीच्या ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीकडे सोपविण्यात आली आहे. स्थानिक पातळीवर जिल्हा परिषद यंत्रणा गावास हवी असलेली सर्वतोपरी मदत करेल. म्हणूनच ''लोकांचा पुढाकार

त्यात शासनाचा सहभाग'' हे या नवीन धोरणाचे ब्रीद वाक्य ठरविण्यात आले.

सन २००३ पासून महाराष्ट्रात हागणदारीमुक्त गाव अभियान आता सर्वच जिल्ह्यात अग्रेसर झाले आहे. सन २००३ पासून शासनाने नवीन संपूर्ण स्वच्छता धोरणाचा (Total Sanitation Campaign) स्विकार आणि अंमलबजावणी करून राज्यात ग्रामीण भागात शौचालय बांधण्याऐवजी 'हागणदारी मुक्त गाव अभियानावर' जास्त भर देण्याचे ठरविले आहे. संपूर्ण स्वच्छता अभियानातील महत्त्वाचे घटक म्हणजे लोकसहभाग, शालेय स्वच्छतागृह, महिला स्वच्छता गृह, वैयक्तिक स्वच्छतागृह इ. आहेत. माहिती, शिक्षण व संवादाद्वारे (Information, Education and Communication IEC) स्वच्छतेबाबत 'लोकांची गरज' ही धारणा निर्माण करून स्वच्छता व परिसर स्वच्छतेबाबत सर्व कामे मागणी आधारित (Demand based) करण्याचे ठरविले आहे. यातच आता केंद्रशासन पुरस्कृत 'निर्मल ग्राम' पारितोषिकांची भर पडली असून १००% हागणदारीमुक्त गावांना रु. २ ते ४ लाखांचे बक्षिस मिळू शकते.

थोडक्यात, १९६० नंतर महाराष्ट्र राज्यात पाणीपुरवठा आणि सार्वजनिक स्वच्छता या क्षेत्रात सुधारणा घडून यावी म्हणून भरपूर खर्च करूनही म्हणावी तशी प्रगती मात्र झाली नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने शासनाचा पुढाकार असलेले पुरवठा आधारित धोरण (Supply driven policy) सोडून देऊन २०००-०१ पासून लोकांचा पुढाकार त्यांचा सक्रीय सहभाग आणि त्यात शासनाचा सहभाग असलेले नवे मागणी आधारित (Demand driven) धोरण स्विकारले आहे. महाराष्ट्राची 'संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान' ही योजना तसेच केंद्र शासनपुरस्कृत 'संपूर्ण स्वच्छता अभियान' (Total sanitation campaign) या दोन्ही योजना आता महाराष्ट्रात नव्या धोरणावर आधारित आहेत.

## ब) संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची रूपरेषा

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान या योजनेचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न या भागात करण्यात आला आहे.

## १) अभियानाची सुरूवात, महत्त्व आणि पारितोषिके :

सन २०००-०१ पासून संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा व सन २००१-०२ पासून राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ पंचायत समिती व स्वच्छ जिल्हा परिषद स्पर्धा अशा स्वरूपात राबविण्यात आल्या. तसेच २००२-०३ पासून स्वच्छतेशी व ग्रामविकासाशी निगडीत एखाद्या विशिष्ट क्षेत्रात भरीव काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना जिल्हा विभाग व राज्य स्तरावर विशेष बक्षीसे देण्याचा उपक्रमही सुरू करण्यात आला आहे.

या योजनेची व्यापकता वाढविल्यानंतर तिला जनतेकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळू लागला. स्वच्छतेविषयी जनजागृती होऊ लागली त्यामुळे ग्रामीण भागात "स्वच्छतेतून समृद्धीकडे" ही संकल्पना जोपासण्यास मदत होऊ लागली. लोकसहभागातून होणारी विकासाची अनेक कामे होऊ लागली. ह्या बाबी ध्यानात घेऊन ग्रामीण भागात कायमस्वरूपी 'स्वच्छतेची संस्कृती' निर्माण करण्याच्या दृष्टीकोणातून आखलेला हा कार्यक्रम केवळ अभियान व स्पर्धा यापुरता सिमीत न राहता ती एक विधायक व अभिनव लोकचळवळ व्हावी, असा शासनाचा मानस तयार झाला. यास्तव, या अभियानात सातत्य राहून त्याला लाभलेला लोकसहभाग सतत वृद्धींगत व्हावा यासाठी या अभियानाची अंमलबजावणी एक लोक चळवळ या स्वरूपात वर्षभर सुरू ठेवण्याचा प्रयत्न शासनामार्फत झाला.

उघड्यावर शौचविधीमुळे ग्रामीण परिसर सर्वात जास्त प्रदुषित होतो. त्याचे आरोग्यावर अनिष्ट व आयुष्यभर भोगावे लागणारे परिणाम होतात. या अभियानामुळे गाव, परिसर स्वच्छ होऊ लागले. लोकांना शौचालय वापराचे महत्त्व पटल्यामुळे केवळ शासनाच्या मदतीवर अवलंबून न राहता प्रसंगी कर्ज घेऊनही लोक शौचालय बांधू लागले. निव्वळ शौचालयाचे बांधकाम होत नसून त्याच्या वापरात वाढ होऊ लागली आहे. तरीही गावातील केवळ एक व्यक्ती जरी उघड्यावर जात असेल तर ती संपूर्ण गावाचे आरोग्य दूषित करते. ग्रामीण भागात वारंवार उद्‌भवणाऱ्या पटकी, विषमज्वर, कावीळ इ. साथी सुद्धा मानवी विष्ठेमुळे दूषित झालेले पाणी प्यायल्याने उद्‌भवतात हे कटू सत्य आहे. हे

टाळण्यासाठी स्वच्छतेशी निगडीत एकूण सर्व घटकांबरोबरच, शौचालयाचा योग्य व नियमित वापर अनिवार्य आहे. यास्तव शौचालयाच्या स्वयंस्फुर्त बांधकामास व त्याच्या योग्य वापरास या अभियानाच्या माध्यमातून अधिक चालना देण्याच्या दृष्टीकोणातून सन २००३-०४ पासून या अभियानाच्या अंमलबजावणीत शौचालय या घटकास अधिक महत्त्व देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. तसेच आरोग्याच्या दृष्टीकोणातून पिण्याच्या पाण्याची व अन्नपदार्थांची योग्य हाताळणी इ. आणखी काही सुधारणा करण्याचा प्रयत्न शासनाने केला.

शासनाने वरील सर्व बाबी विचारात घेऊन एक एकत्रित परिपत्रक काढले. त्या परिपत्रकात या योजनेची संपूर्ण माहिती देण्यात आली आहे. शासनाच्या निर्णयानुसार घरांची, गावांची व परिसरांची स्वच्छता व्हावी व ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेचे आरोग्यमान व पर्यायाने जीवनमान उंचवावे व त्यायोगे 'स्वच्छतेतून समृद्धीकडे' ही संकल्पना मूर्त स्वरूपात यावी, या उद्देशाने ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत जे कार्यक्रम आखण्यात येतात त्या कार्यक्रमांची परिणामकारक अंमलबजावणी करून गावातील स्वच्छतेची परिस्थिती सुधारण्यासाठी ग्रामस्थांचा उत्स्फुर्त सहभाग व सहकार्य अपेक्षित आहे. त्यात ग्रामीण जनतेने आपली कल्पकता व परंपरागत ज्ञानाच्या आधारे, स्थानिक कच्च्या मालाचा वापर करून, स्वच्छता तंत्र विकसित करण्याची गरज आहे. यामध्ये शासनाची भूमिका सहाय्यकर्ता सहभागीदार व मार्गदर्शकाची असणार आहे. यासाठी ग्रामीण भागातील स्वच्छतेची दुरावस्था पाहून ग्रामीण परिसर स्वच्छ रहावा म्हणून ज्यांनी स्वत: परिश्रम घेतले त्या 'संत गाडगेबाबा' यांच्या नावाने सन २०००-०१ पासून दरवर्षी ग्राम स्वच्छता अभियान संपूर्ण महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात राबविण्यात येत आहे.

हे अभियान केवळ मोहिम स्वरूपात न राबविता सन २००३-०४ पासून लोकचळवळ स्वरूपात वर्षभर राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच ही चळवळ दृढमूल होण्यासाठी खालीलप्रमाणे पारितोषिके देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

अ) या अभियानांतर्गत ज्या ग्रामपंचायती हिरीरीने सहभागी होतील त्यांच्यातून खाली

नमूद केलेल्या स्तरावर स्वच्छतेचा महामंत्र महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात 'ग्रामगीते'द्वारे पोहचविणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या नावाने रोख स्वरूपात बक्षीसे देऊन त्याच्या कार्याचा गौरव करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

१) पंचायत समिती स्तरावर उत्कृष्ट ठरणाऱ्या प्रत्येक पंचायत समिती क्षेत्रातील पहिल्या तीन ग्रामपंचायती.

२) जिल्हा स्तरावर उत्कृष्ट ठरणाऱ्या प्रत्येक जिल्ह्यातील तीन ग्रामपंचायती.

३) विभागीय स्तरावर उत्कृष्ट ठरणाऱ्या प्रत्येक विभागातील दोन ग्रामपंचायती.

४) राज्यस्तरावर संपूर्ण राज्यात उत्कृष्ट ठरणाऱ्या पहिल्या तीन ग्रामपंचायती.

ब) जिल्हा परिषद क्षेत्रातील व पंचायत समिती क्षेत्रातील एकूण ग्रामपंचायतीच्या संख्येचा विचार करून ज्यांच्या क्षेत्रात, सर्वात जास्त टक्केवारीने ग्रामपंचायतींना ५० % पेक्षा अधिक गुण मिळाले आहेत, अशा प्रत्येक महसूली विभागातील गुणानुक्रमे एक जिल्हापरिषद व एक पंचायत समिती आणि राज्यातील गुणानुक्रमे पहिल्या तीन जिल्हा परिषदा व राज्यातील पहिल्या तीन पंचायत समित्यांना राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या नावाने रोख स्वरूपात बक्षीसे, स्मृतीचिन्हे व प्रमाणपत्र देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

क) जिल्हा विभाग व राज्य स्तरावर जी गावे कुटुंबकल्याण, पिण्याचे पाणी व सांडपाणी व्यवस्थापन, सामाजिक एकता या विषयात उत्कृष्ट कामगिरी बजावतील त्यांना अनुक्रमे स्व. आबासाहेब खेडकर, स्व. वसंतराव नाईक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर रोख स्वरूपात विशेष बक्षीसे व प्रमाणपत्र देऊन यांच्या कार्याचा गौरव करण्याचा निर्णय शासनाने घेतला.

ड) या अभियानासंदर्भात उत्कृष्ट लेख व बातमी पत्रकारांना स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने जिल्हा व राज्य स्तरावर प्रत्येकी तीन रोख बक्षीसे देण्याचा निर्णय शासनाने घेतला.

इ) या व्यतिरिक्त जिल्हा परिषद मतदार संघस्तरीय तपासणीत निवडलेल्या गुणानुक्रमे प्रथम तीन ग्रामपंचायतींना संबंधीत जिल्हा परिषदा आपल्या स्वनिधीतून अथवा प्रायोजकांमार्फत रोख अथवा साहित्य रूपाने बक्षीसे देऊ शकतात. ह्या बक्षीसांची रक्कम जास्तीत जास्त अनुक्रमे रु. ५०००, रु. ३०००, रु. २००० एवढी असेल.

## २) अभियानाची पूर्वतयारी व औपचारिक सुरूवात :

काळबद्धरित्या अभियानाची पूर्वतयारी कशी करावी याबाबतच्या शासनाच्या मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे आहेत.

### अ) दरवर्षी दि. २० ते २५ सप्टेंबर :

या अभियानाची लाक्षणिक स्वरूपात सुरवात जरी दरवर्षी २ ऑक्टो. पासून होत असली तरी तत्पूर्वी दि. २० ते २५ सप्टें. या कालावधीत या अभियानाची पूर्वतयारी करण्यात यावी, असे शासनाला अभिप्रेत आहे. या कालावधीत जिल्हा स्तरावर पालकमंत्री, जिल्हा ग्राम स्वच्छता अभियान समितीची सभा घेतील व दि. २ ऑक्टों. पासून सुरू होणाऱ्या अभियानात सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन करतील.

### ब) दरवर्षी दि. २६ ते २९ सप्टेंबर :

या काळात गटविकास अधिकारी, तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामसेवक यांची सभा तालुका स्तरावर बोलावतील. सदर सभेस संबंधीत मा. आमदार, पंचायत समितीतील सर्व जिल्हा परिषद सदस्य, सभापती, उपसभापती, पंचायत समिती सदस्य, सेवाभावी संस्था, कॉलेजचे प्राध्यापक, स्वातंत्र्य सैनिक इ. मान्यवरांना निमंत्रित करण्यात यावे व सर्वांना अभियानात सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन करावे, असे शासकीय परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

### क) दरवर्षी दि. ३० सप्टेंबर :

या दिवशी ग्रामपंचायतीमध्ये सरपंच, ग्रामपंचायत समितीची मासिक सभा घेतील. या सभेत ग्राम स्तरावरील अभियान समिती संघटित केली जाईल. जर या दिवशी

ग्रामपंचायतीची मासिक सभा घेणे शक्य झाले नाही तर दि. १ ऑक्टोबर रोजी ही सभा घेण्यात येते.

**ड) दरवर्षी दि. १ ऑक्टोबर :**

दि. १ ऑक्टोबर रोजी महिला ग्रामसभा बोलाविण्यात यावी व अभियानाच्या तयारीची चर्चा करून कृती कार्यक्रम तयार केला जावा, अशी शासनाची अपेक्षा आहे.

**अभियानाची औपचारिक सुरवात :**

**इ) दरवर्षी दि. २ ऑक्टोबर :**

या दिवशी सर्व ग्रामपंचायतीत ग्रामसभा व्हाव्यात व त्यास जिल्हा स्तरावरील शासकीय कर्मचारी उपस्थित रहावा यासाठी प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, सर्व शासकीय खात्यातून आवश्यक तो कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देतात. या दिवशी संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची औपचारिक सुरूवात होते.

**३) वातावरण निर्मितीकरिता लाक्षणिक स्वरूपातील कृतीकार्यक्रम:**

ग्रामस्वच्छता अभियानाअंतर्गत यानंतर ग्रामपंचायत स्तरावर पुढीलप्रमाणे कार्यक्रम राबविण्यात यावेत असे शासनाने स्पष्ट केले आहे.

१) दरवर्षी दि. ३ व ४ ऑक्टोबर : 'ग्रामसफाई व कचरामुक्ती जागृती मोहिम'

२) दरवर्षी दि. ५ व ६ ऑक्टोबर : 'शोषखड्ड्यांची स्वच्छता व बांधकाम जागृती मोहिम'

३) दरवर्षी दि. ७ व ८ ऑक्टोबर : 'शाळा व सार्वजनिक इमारती स्वच्छता जागृती मोहिम'

४) दरवर्षी ९ व १० ऑक्टोबर : 'घर व परिसर स्वच्छता / सजावट मोहिम'

५) दरवर्षी दि. ११ व १२ ऑक्टोबर : 'स्वच्छता विषयक साहित्याचे प्रदर्शन व प्रात्यक्षिक प्रचारप्रसिद्धी याबाबतच्या तांत्रिक ज्ञानाबाबतची प्रात्यक्षिके'

६) दरवर्षी दि. १३ व १४ ऑक्टोंबर : 'शौचालय दुरूस्ती / बांधकाम अभियान मोहिम'

७) दरवर्षी दि. १५ व १६ ऑक्टोबर : 'पाणी शुद्धता, प्रात्यक्षिक व प्रशिक्षण मोहिम'

८) दरवर्षी दि. १७ व १८ ऑक्टोबर : 'वैयक्तीक स्वच्छता जागृती (नखे काढणे, स्वच्छ अंघोळ, केस धुणे, उवा निर्मुलन) मोहिम'

९) दरवर्षी दि. १९ व २० ऑक्टोबर : 'रस्ते दुरूस्ती, सफाई व श्रमदान मोहिम'

१०) दरवर्षी दि. २१ व २२ ऑक्टोबर : 'जनावरे स्वच्छता मोहिम, आदर्श गोठा व स्वच्छ जनावर स्पर्धा'

११) दरवर्षी दि. २३ व २४ ऑक्टोबर : 'वृक्षसंवर्धन, परसबाग, अपारंपारिक ऊर्जा संरक्षण मोहिम'

१२) दरवर्षी दि. २५ व २६ ऑक्टोबर : 'गावात स्लोगन (घोषवाक्य) स्पर्धा, निबंध स्पर्धा, व्यसनमुक्ती मोहिम'

१३) दरवर्षी दि. २७ व २८ ऑक्टोंबर : 'सदृढ बालक स्पर्धा, माता-बालसंगोपन, रोगनिदान व साथी रोग प्रतिबंध मोहिम'

१४) दरवर्षी दि. २९ व ३० ऑक्टोबर : 'गटारे सांडपाणी निर्मुलन, सांडपाणी वापर मोहिम'

१५) दरवर्षी दि. ३१ ऑक्टोबर : 'संकल्प दिवस'

वरील दिवसात स्वच्छतेशी निगडीत नमूद केलेल्या बाबी ज्या ग्रामपंचायत क्षेत्रात सातत्याने पुढे वर्षभर राबवावयाच्या आहेत, त्यांची ग्रामस्थांना माहिती व्हावी, त्यातून त्या घटकांबाबत त्यांच्यात जाणीव जागृती व्हावी या दृष्टीने या कालावधीत कार्यक्रम आयोजित करणे अपेक्षित असतात. तसेच या कालावधीत ग्रामपंचायत स्तरावर किंवा त्याखाली गाव, वार्ड, वस्ती, शाळा, मंडळे स्तरावर त्या दिवसाचे महत्त्व विचारात घेऊन वैयक्तिक स्पर्धा आयोजित करतात. जसे उदा. आदर्श माता, स्वच्छ घर, स्वच्छ शाळा वर्ग, स्वच्छ गोठा, स्वच्छ गल्ली, स्वच्छ वस्ती, उत्कृष्ठ पाणी साठवण, उत्कृष्ट जनावर, उत्कृष्ट स्वयंपाक, सदृढ मुल इ.

## ४) अभियानातील कार्यक्रम तपासणीस सामोरे जाण्यासाठी ग्रामपंचायतीची तयारी :

### अ) दरवर्षी दि. १ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर :

अभियानांतर्गत स्पर्धेत भाग घेणारी गावे तपासणी समित्यांना सामोरे जाण्यासाठी आपापल्या स्तरावर, आपापल्या तांत्रिक पारंपारिक ज्ञानाचा उपयोग करून आपापल्या पद्धतीने तयारी करतात. यासाठी ती ती गावे सेवाभावी संस्था, या अभियानात पूर्वी उत्कृष्ट ठरलेली गावे, तज्ञ व्यक्ती यांची मदत आपापल्या परीने प्राप्त करून घेतात. गावात राबविलेल्या अभियानाची तपासणी प्रामुख्याने ज्या प्रमुख मुद्दे व त्याच्या पोटमुद्याच्या आधारे करण्यात येते.

### ब) दरवर्षी दि. १० जानेवारी ते २० जानेवारी :

पंचायत समिती स्तरीय समितीच्या त्यांना संबंधीत विभागीय आयुक्तांनी नेमून दिलेल्या दुसऱ्या जिल्ह्याच्या पंचायत समिती क्षेत्रातील, जिल्हा परिषद मतदार संघस्तरीय समित्यांनी निवडलेल्या पहिल्या तीन ग्रामपंचायतींना तपासणी भेटी दिल्या जातात.

### क) दरवर्षी दि. २७ जानेवारी ते ५ एप्रिल :

जिल्हा स्तरीय समितीच्या त्यांना नेमून दिलेल्या जिल्ह्यातील प्रत्येक पंचायत समितीतील पहिल्या व दुसऱ्या क्रमांकाच्या ग्रामपंचायतीपैकी किमान ६०% पेक्षा जास्त गुण मिळालेल्या ग्रामपंचायतींना तपासणी भेटी दिल्या जातात व त्यामधून अभियानाअंतर्गत द्यावयाच्या बक्षीसासाठी गुणानुक्रमे प्रथम तीन ग्रामपंचायतींची निवड केली जाते.

तसेच ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत द्यावयाच्या तीन विशेष पुरस्कारासाठी जिल्हा स्तरावर अभियानांतर्गत गुणानुक्रमे बक्षीसे मिळालेल्या तीन ग्रामपंचायती व्यतिरिक्त अन्य तपासलेल्या उर्वरित ग्रामपंचायतींमधून तीन ग्रामपंचायतींची निवड केली जाते.

### ड) दरवर्षी दि. २ मे ते १५ जुलै :

विभाग स्तरीय समितीच्या त्यांना शासनाने नेमून दिलेल्या विभागाच्या प्रत्येक

जिल्ह्यातील पहिल्या व दुसऱ्या क्रमांकाच्या ग्रामपंचायतीपैकी किमान ६०% गुण मिळालेल्या ग्रामपंचायतींना तपासणी भेटी व त्यामधून अभियानाअंतर्गत द्यावयाच्या बक्षिसासाठी गुणानुक्रमे प्रथम व द्वितीय ग्रामपंचायतींची निवड केली जाते.

तसेच अभियानाअंतर्गत द्यावयाच्या तीन विशेष पुरस्कारासाठी विभाग स्तरावर अभियानांतर्गत बक्षिसे मिळालेल्या गुणानुक्रमे दोन ग्रामपंचायती व्यतिरिक्त तपासलेल्या उर्वरित ग्रामपंचायतींमधून तीन ग्रामपंचायतींची निवड केली जाते.

**इ) दरवर्षी दि. १६ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर :**

विभाग स्तरीय समितीने प्रत्येक विभागातून गुणानुक्रमे निवडलेल्या दोन उत्कृष्ट ग्रामपंचायतीपैकी ज्यांना ६०% गुण मिळाले असतील त्या ग्रामपंचायतींना राज्यस्तरीय समितीच्या तपासणी भेटी व त्यामधून अभियानाअंतर्गत द्यावयाच्या बक्षिसासाठी गुणानुक्रमे प्रथम तीन ग्रामपंचायतींची निवड तसेच अभियानाअंतर्गत द्यावयाच्या तीन विशेष पुरस्कारासाठी अभियानांतर्गत तीन बक्षिसे मिळालेल्या ग्रामपंचायती व्यतिरिक्त अन्य तीन ग्रामपंचायतींची निवड केली जाते.

## ५) पत्रकारांना द्यावयाच्या पारितोषिकासाठी पत्रकारांची निवड :

**अ) दरवर्षी दि. २७ जानेवारी ते १५ एप्रिल :**

ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत पत्रकारास द्यावयाच्या जिल्हा स्तरीय बक्षिसासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय निवड समितीमार्फत तीन पत्रकारांची निवड करण्यात येते.

**ब) दरवर्षी १६ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर :**

अभियानांतर्गत पत्रकारास द्यावयाच्या राज्यस्तरीय बक्षिसासाठी मा. मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित राज्यस्तरीय समिती मार्फत तीन पत्रकारांची निवड करण्यात येते.

### ६) महात्मा गांधी पंचायत समिती व स्वच्छ जिल्हा परिषद स्पर्धा :

प्रत्येक विभागस्तरीय समितीद्वारे आपल्याच विभागातील एका सर्वात स्वच्छ जिल्हा परिषद व एका सर्वात स्वच्छ पंचायत समितीची निवड केली जाते. तसेच राज्यातील गुणानुक्रमे सर्वात स्वच्छ प्रथम तीन जिल्हा परिषदा व गुणानुक्रमे सर्वात स्वच्छ प्रथम तीन पंचायत समित्यांची निवड राज्यस्तरीय समिती करते.

विभाग व राज्य स्तरावर निवडावयाच्या स्वच्छ पंचायत समितीची व स्वच्छ जिल्हा परिषदेची निवड करण्याबाबतचे निकष व कार्यपद्धती स्वतंत्रपणे कळविण्यात येते.

### ७) अभियानाअंतर्गत उत्कृष्ट ग्रामपंचायतींची व विशेष बक्षिसासाठी ग्रामपंचायतींची निवड करण्यासंदर्भात विविध स्तरावरील समित्यांची रचना, कार्यपद्धती आणि पारितोषिकांचा तपशील :

प्रत्येक स्तरावरील तपासणीचा कालावधी, निवडीचे कार्यक्षेत्र, अहवाल सादर करण्याची मुदत, बक्षिसांचे स्वरूप व रक्कम, बक्षिस वितरण समारंभाचा दिवस व बक्षिस कोणाच्या हस्ते वितरीत करावे या बाबतचा तपशील शासनामार्फत तयार करण्यात आला आहे.

#### अ) प्रथम फेरी - जिल्हा परिषद मतदार संघस्तरीय तपासणी :

सर्वात प्रथम जिल्हा परिषद मतदार संघस्तरीय समितीच्या, त्यांना नेमून दिलेल्या जिल्हा परिषद मतदार संघातील ग्रामपंचायतींना, तपासणी भेटी होतील.

#### १) समितीची रचना :

या समितीमध्ये खाली नमूद केलेले सदस्य समाविष्ठ असतात. ज्या जिल्हा परिषद मतदार संघातील ग्राम पंचायतींची तपासणी करावयाची आहे तो मतदार संघ ज्या पंचायत समिती क्षेत्रात अंतर्भुत असेल ती पंचायत समिती सोडून जिल्ह्यातील कोणत्याही

१) दुसऱ्या पंचायत समिती कार्यक्षेत्रातील जिल्हा परिषद कौन्सीलर अध्यक्ष.

२) दुसऱ्या पंचायत समितीतील दोन पंचायत समिती सदस्य-सदस्य

३) दुसऱ्या पंचायत समितीतील कोणतीही एक मुख्य सेविका (एकात्मिक बालविकास सेवा) सदस्य.

४) दुसऱ्या पंचायत समितीतील कोणत्याही प्राथमिक आरोग्य केंद्राचे एक डॉक्टर - सदस्य.

५) दुसऱ्या पंचायत समितीतील कोणत्याही एका प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका - सदस्य

६) सेवाभावी संस्थेचा एक प्रतिनिधी (मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी नियुक्त केलेला) सदस्य.

७) विकास गटाबाहेरील कोणताही एक शाखा अभियंता (Water Supply/Works) - सदस्य.

८) जिल्हा पत्रकार संघ, लायन्स क्बल, एन.एस.एस., एन.सी.सी. इ. यंत्रणातील शिफारस केलेल्या प्रतिनिधींपैकी सभापती, पंचायत समिती यांनी नियुक्त केलेला एक प्रतिनिधी- सदस्य.

९) 'ग्रामस्थांच्या सनद' अंतर्गत स्थापन केलेल्या प्रभाग समितीचे सचिव, उपरोक्त समितीचे सदस्य सचिव म्हणून काम बघतील.

वरील सर्व समिती सदस्य दुसऱ्या पंचायत समितीतील एकाच जिल्हा परिषद मतदार संघातील असण्यास हरकत नाही.

## २) कार्यपद्धती :

या प्रथम तपासणी फेरीत सदर समितीने, नेमून दिलेल्या जिल्हा परिषद मतदार संघातील अभियानात सहभागी झालेल्या सर्व ग्रामपंचायतींना भेटी देऊन ग्रामपंचायत क्षेत्रात एकूण किमान ५० टक्के कुटुंबांना शौचालयाची सुविधा उपलब्ध आहे याची पडताळणी करून नंतर सदर समितीने अभियानाअंतर्गत नेमून दिलेल्या सर्व निकषानुसार केलेल्या कामाची तपासणी काटेकोरपणे करावी. त्यानंतर अशा पात्र ग्रामपंचायतीतून किमान ५०% गुण मिळालेल्या गुणानुक्रमे तीन उत्कृष्ट ग्रामपंचायतींची निवड करून व ती ज्या प्रभागातील

गावाची तपासणी केली त्या ग्रामपंचायतीच्या प्रभाग समितीची व तपासलेल्या ग्रामपंचायतींच्या सरपंचांची व प्रतिनिधींची सभा घेऊन त्यात जाहीर करावयाची आहे. या सभेत गावांना क्रमांक देण्याची, गुण देण्याची कारणमीमांसा देण्यात यावी. अर्थात, समितीचा निर्णय अंतिम राहिल व समितीच्या कारणमीमांसेला कोठेही आवाहन देता येणार नाही, असेही परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. प्रत्येक सदस्याने प्रथम प्रत्येक मुद्यांवर स्वतंत्र गुण देऊन त्यांचे एकत्रिकरण नंतर सदस्य सचिवाने करून त्यांची सरासरी काढून नंतर त्याबाबतचा अहवाल निवड समितीतील सर्व सदस्यांच्या सह्या घेऊन संबंधित गटविकास अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना बंद पाकीटात पाठवायचा आहे. तसेच प्रत्येक ग्रामपंचायतीला बाबनिहाय मिळालेल्या सरासरी गुणांची गुणपत्रिका निवड समितीचे अध्यक्ष व सदस्य सचिव यांच्या सहीने गट विकास अधिकाऱ्यांमार्फत संबंधित ग्रामपंचायतीस, विहित नमुन्यात पाठवावयाची आहे.

**ब) दुसरी फेरी – पंचायत समिती स्तरीय तपासणी :**

**१) समितीची रचना :**

या समितीमध्ये खाली नमूद केलेले सदस्य समाविष्ट असतात.

१) पंचायत समितीचे सभापती - अध्यक्ष

२) पंचायत समितीचे उपसभापती - सदस्य

३) पंचायत समितीतील बालविकास प्रकल्प अधिकारी एकात्मिक बालविकास सेवा योजना - सदस्य.

४) पंचायत समितीतील गट शिक्षणाधिकारी - सदस्य

५) पंचायत समितीतील एक उप अभियंता (बांधकाम / पाणी पुरवठा / लघुसिंचन) - सदस्य.

६) पंचायत समितीतील कोणत्याही एका आरोग्य केंद्राचे डॉक्टर - सदस्य.

७) जिल्हा पत्रकार संघाने नियुक्त केलेला, अभियानाशी प्रत्यक्ष हितसंबंध नसलेला प्रतिनिधी

- सदस्य.

८) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नियुक्त केलेली एक सेवाभावी संस्था / सोशल क्लब, एन.एस.एस. / एन.सी.सी. यांचे प्रतिनिधी - सदस्य.

९) गटविकास अधिकारी - सदस्य सचिव.

वरील सर्व अधिकारी एकाच पंचायत समितीतील असण्यास हरकत नाही.

**२) कार्यपद्धती :**

या समितीने दुसऱ्या जिल्ह्यातील ज्या पंचायत समिती क्षेत्रासाठी त्यांची नियुक्ती केलेली असेल त्या पंचायत समितीतील प्रत्येक जिल्हा परिषद मतदार संघातून निवडलेल्या गुणानुक्रमे तीन ग्रामपंचायतींची यादी करावी व त्यापैकी ६०% गुण मिळालेल्या सर्व ग्रामपंचायती तपासून, पंचायत समिती स्तरावरील गुणानुक्रमे तीन ग्रामपंचायती, विहित निकष विचारात घेऊन निवडावयाच्या असतात.

ही निवड करताना प्रत्येक सदस्याने प्रथम प्रत्येक मुद्यावर स्वतंत्र गुण देऊन त्यांचे एकत्रीकरण नंतर सदस्य सचिवाने करून त्याची सरासरी काढून नंतर त्याबाबतचा अहवाल निवड समितीतील सर्व सदस्यांच्या सह्या घेऊन संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांना बंद पाकीटात पाठवावयाचा असतो. तसेच प्रत्येक ग्रामपंचायतीला बाबनिहाय मिळालेल्या सरासरी गुणांची गुणपत्रिका निवड समितीचे अध्यक्ष व सदस्य सचिव यांच्या सहीने संबंधित ग्रामपंचायतीस पाठवावयाची असते.

**क) तिसरी फेरी – जिल्हा स्तरीय तपासणी :**

**१) समितीची रचना :**

या समितीमध्ये खाली नमूद केलेले सदस्य समाविष्ठ असतात.

१) अध्यक्ष जिल्हापरिषद - अध्यक्ष

२) महिला व बालकल्याण समितीचे सभापती - सदस्य

३) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद - सदस्य

४) जिल्हा शिक्षण अधिकारी (प्राथमिक) - सदस्य

५) कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा परिषद - सदस्य

६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण), जिल्हा परिषद - सदस्य.

७) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नियुक्त केलेला एक सेवाभावी संस्थेचा प्रतिनिधी - सदस्य.

८) जिल्हा पत्रकार संघाने नियुक्त केलेला प्रतिनिधी-सदस्य.

९) जिल्हा आरोग्य अधिकारी - सदस्य.

१०) जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक - सदस्य.

११) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) - सदस्य सचिव.

## २) कार्यपद्धती :

जिल्ह्यातील प्रत्येक पंचायत समितीतून निवड करण्यात आलेल्या प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या ग्रामपंचायतींपैकी ज्या ग्रामपंचायतींना किमान ६०% गुण मिळालेले आहेत त्यांची तपासणी करून जिल्हास्तरावरील गुणानुक्रमे तीन ग्रामपंचायतींची निवड करण्यात येते. तसेच सदर निकाल संबंधित जिल्हा परिषदेत पदाधिकारी, अधिकारी, पत्रकार यांच्या सभेत तपासलेल्या संबंधित ग्रामपंचायतींच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत जाहीर करण्यात येतो. यावेळी प्रत्येक ग्रामपंचायतींनी केलेले उत्कृष्ट कार्य, तसेच अधिक सुधारणा अपेक्षित असलेल्या बाबी सांगण्यात येतात. या सर्व ग्रामपंचायतींना मिळालेल्या बाबनिहाय एकत्रित सरासरी गुणांची गुणपत्रिका, समितीचे अध्यक्ष व सदस्य सचिव यांच्या सहीने संबंधित जिल्हा परिषदेमार्फत त्यांना पाठवावयाची व्यवस्था केली जाते.

या व्यतिरिक्त, सदर समिती, ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत ग्रामपंचायतींना द्यावयाच्या तीन विशेष पुरस्कारासाठी अभियानांतर्गत बक्षिस मिळालेल्या ग्रामपंचायतीं

व्यतिरिक्त तपासलेल्या उर्वरित ग्रामपंचायतीतून, तीन ग्रामपंचायतींची निवड करतात.

ही निवड करताना प्रत्येक सदस्याने प्रथम प्रत्येक मुद्यांवर स्वतंत्र गुण देऊन त्यांचे एकत्रिकरण नंतर सदस्य सचिवाने करून त्याची सरासरी काढून नंतर त्याबाबतचा अहवाल निवड समितीतील सर्व सदस्यांच्या सह्या घेऊन संबंधित विभागीय आयुक्त व प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना बंद पाकीटात पाठवावयाचा असतो. तसेच प्रत्येक ग्रामपंचायतीला बाबनिहाय मिळालेल्या सरासरी गुणांची गुणपत्रिका निवड समितीचे अध्यक्ष व सदस्य सचिव यांच्या सहीने संबंधित ग्रामपंचायतीस विहित नमुन्यात पाठवावयाची व्यवस्था केली जाते.

ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत पत्रकारास द्यावयाच्या बक्षिसासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीमार्फत तीन पत्रकारांची निवड केली जाते.

## ड) चौथी फेरी – विभागीय स्तरीय तपासणी

**१) समितीची रचना :** या समितीमध्ये पुढील सदस्य समाविष्ट झालेले असतात.

१) विभागीय आयुक्त - अध्यक्ष

२) उपायुक्त (विकास) - सदस्य सचिव

३) विभागीय आरोग्य उपसंचालक - सदस्य

४) विभागीय मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण - सदस्य.

५) विभागीय उपसंचालक भूसविय-सदस्य

६) विभागीय उपसंचालक शिक्षण - सदस्य.

७) विभागीय आयुक्तांनी निवडलेली कोणतीही एक सेवाभावी संस्था - सदस्य.

८) एक, ज्येष्ठ पत्रकार / संपादक - सदस्य.

### २) कार्यपद्धती :

ही समिती संबंधित विभागातील प्रत्येक जिल्ह्यातील गुणानुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविलेल्या ग्रामपंचायतीपैकी किमान ६०% पेक्षा जास्त गुण मिळविलेल्या ग्रामपंचायतींना भेटी देऊन त्यापैकी गुणानुक्रमे दोन सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायतींची निवड करते. तसेच अभियानाअंतर्गत ग्रामपंचायतींना द्यावयाच्या तीन विशेष पुरस्कारासाठी अभियानांतर्गत गुणानुक्रमे दोन बक्षिसे मिळालेल्या ग्रामपंचायती व्यतिरिक्त तपासलेल्या उर्वरित ग्रामपंचायतीमधून तीन ग्रामपंचायतींची निवड करते.

ही निवड करताना प्रत्येक सदस्याने प्रथम प्रत्येक मुद्यांवर स्वतंत्र गुण देऊन त्यांचे एकत्रिकरण नंतर सदस्य सचिवाने करून त्याची सरासरी काढून नंतर त्याबाबतचा अहवाल निवड समितीतील सदस्यांच्या सह्या घेऊन सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना बंद पाकीटात पाठवावयाचा असतो. तसेच ग्रामपंचायतीला बाबनिहाय मिळालेल्या सरासरी गुणांची गुणपत्रिका निवड समितीचे अध्यक्ष व सदस्य सचिव यांच्या सहीने संबंधित ग्रामपंचायतीस पाठवावयाची असते.

तसेच विभागातून एका स्वच्छ जिल्हा परिषदेची व एका स्वच्छ पंचायत समितीची निवड देखील ही समिती करते.

ग्रामपंचायतींना द्यावयाच्या सदर दोन्ही बक्षिसांची रक्कम पहिल्या वर्षी ५०% बक्षिस समारंभ प्रसंगी वितरीत करण्यात येते. त्यापुढील वर्षात सदर ग्रामपंचायतींनी स्वच्छतेचा दर्जा राखला आहे किंवा नाही याची तपासणी संबंधित विभागीय आयुक्तांनी करावी, त्यानंतर उर्वरित ५०% बक्षिसाची रक्कम वितरित करण्याचा निर्णय त्यांनी घ्यावयाचा असतो.

## इ) पाचवी फेरी – राज्यस्तरीय तपासणी :

### १) समितीची रचना :

१) मा. राज्यमंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता - अध्यक्ष

२) सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग - सदस्य

३) सचिव, ग्रामविकास विभाग - सदस्य

४) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण - सदस्य

५) संचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा - सदस्य

६) महासंचालक, आरोग्य महासंचालनालय अथवा त्यांनी नामनिर्देशन केलेले आरोग्य सहसंचालक - सदस्य

७) संचालक, प्राथमिक शिक्षण, पुणे अथवा त्यांनी नामनिर्देशन केलेले शिक्षण सहसंचालक - सदस्य.

८) एक सेवाभावी संस्थेचा प्रतिनिधी म्हणून युनिसेफ / डब्ल्यू. एस. पी. चा प्रतिनिधी - सदस्य.

९) एक ज्येष्ठ पत्रकार / संपादक - सदस्य

१०) उपसचिव तथा संचालक, सु.स.प्र.व्य.क., पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग - सदस्य सचिव.

## २) कार्यपद्धती :

ही समिती प्रत्येक विभागातील गुणानुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविलेल्या ग्रामपंचायतीपैकी किमान ६०% पेक्षा जास्त गुण मिळविलेल्या ग्रामपंचायतींना भेटी देतात. त्यापैकी गुणानुक्रमे तीन सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायतींची निवड करतात. तसेच ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत ग्रामपंचायतींना द्यावयाच्या तीन विशेष पुरस्कारासाठी, अभियानांतर्गत गुणानुक्रमे तीन बक्षिसे मिळालेल्या ग्रामपंचायती व्यतिरिक्त तपासलेल्या उर्वरित ग्रामपंचायतींमधून तीन ग्रामपंचायतींची निवड करतात.

ग्रामपंचायतींना द्यावयाच्या सदर तीनही बक्षिसांची रक्कम पहिल्या वर्षी ५०% बक्षिस समारंभप्रसंगी वितरीत करण्यात येते. त्यापुढील वर्षात सदर ग्रामपंचायतींनी स्वच्छतेचा दर्जा राखला आहे किंवा नाही याची तपासणी संबंधित विभागीय आयुक्तांकडून करून घेऊन, त्यानंतर उर्वरित ५०% बक्षिसाची रक्कम वितरित करण्याचा निर्णय घेण्यात येतो.

**संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेतील पारितोषिकांचा तपशील :**

| फेरी क्र. | बक्षिसाची रक्कम |
|---|---|
| **प्रथम फेरी :** जिल्हापरिषद कौन्सीलर मतदारसंघ स्तरीय समिती तपासणी | या स्तरावरील बक्षिसे ऐच्छिक असून संबंधित जिल्हा परिषद/पंचायत समिती आपल्या स्वनिधीतून अथवा पुरस्कर्ता मिळवून गुणानुक्रमे पहिल्या तीन ग्रामपंचायतींना अनुक्रमे रु. ५, ३ व २ हजारांची बक्षिसे देऊ शकतील. यासाठी कोणतेही शासकीय सहाय्य मिळणार. |
| **दुसरी फेरी :** पंचायत समिती स्तरीय तपासणी | १) प्रथम क्र. ग्रामपंचायत रु. २५ हजार<br>२) द्वितीय क्र. ग्रामपंचायत रु. १५ हजार<br>३) तृतीय क्र. ग्रामपंचायत रु. १० हजार<br>(शासनाकडून) |
| **तिसरी फेरी :** जिल्हापरिषद स्तरीय तपासणी | १) प्रथम क्र. ग्रामपंचायत रु. ५ लाख<br>२) द्वितीय क्र. ग्रामपंचायत रु. ३ लाख<br>३) तृतीय क्र. ग्रामपंचायत रु. २ लाख<br>(शासनाकडून) |
| **चौथी फेरी :** विभाग स्तरीय तपासणी | १) प्रथम क्र. ग्रामपंचायत रु. १० लाख<br>२) द्वितीय क्र. ग्रामपंचायत रु. ६ लाख<br>(शासनाकडून) |
| **पाचवी फेरी :** राज्यस्तरीय तपासणी | १) प्रथम क्र. ग्रामपंचायत रु. २५ लाख<br>२) द्वितीय क्र. ग्रामपंचायत रु. १५ लाख<br>३) तृतीय क्र. ग्रामपंचायत रु. १२.५० लाख |

## ८) बक्षिस वितरण समारंभ :

कोणत्या स्तरावरील बक्षिस वितरण समारंभ कोणत्या दिवशी व कोठे होतील याचीही निश्चिती शासनाने केली आहे.

### अ) दरवर्षी दि. २६ जानेवारी :

पंचायत समिती स्तरीय समितीने निवडलेल्या प्रत्येक पंचायत समिती क्षेत्रातील तीन ग्रामपंचायतींचा संबंधित बक्षिसपात्र गावात बक्षिस वितरण समारंभ घेतला जातो.

### ब) दरवर्षी दि. २ मे :

जिल्हा स्तरावर निवडलेल्या गुणानुक्रमे तीन व विशेष बक्षिसपात्र तीन ग्रामपंचायतींचा, संबंधित बक्षिस पात्र गावात बक्षिस वितरण समारंभ घेतला जातो.

### क) दरवर्षी दि. १५ ऑगस्ट :

विभाग स्तरावरील शासकीय ध्वजावंदन समारंभ ज्या मा. मंत्री महोदयांच्या हस्ते होईल त्या मा. मंत्रीमहोदयांच्या हस्ते विभाग स्तरावरील बक्षिस समारंभ होईल.

### ड) दरवर्षी दि. २ ऑक्टोबर :

राज्यस्तरावर निवडलेल्या ग्रामपंचायती, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा व पत्रकारांसाठी राज्यस्तरीय बक्षिस वितरण समारंभ घेतला जातो.

## ९) संत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम बक्षिसाबाबतचे नियम :

१) ज्या ग्रामपंचायत क्षेत्रातील एकूण किमान ५०% कुटुंबांना शौचालयाची सुविधा आहे अशाच ग्रामपंचायती या अभियानांतर्गत असलेल्या स्पर्धेसाठी पात्र ठरू शकतील. (सार्वजनिक शौचालयासंदर्भात प्रत्येकी पाच कुटुंबासाठी एक सीट हे प्रमाण घेण्यात येते.)

२) ज्या ग्रामपंचायती संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात सहभागी होतील व ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे या अभियानाअंतर्गत ठरलेल्या प्रत्येक दिवसापासून कार्यक्रम गावात घेतील त्याच ग्रामपंचायती निवडीस पात्र ठरतात. बक्षिसासाठी अशा ग्रामपंचायतींचाच विचार करण्यात येतो.

३) प्रत्येक स्तरावरील समितीने दिलेला निर्णय हा अंतिम असेल त्याबाबत कोणत्याही स्तरावर अपील करता येणार नाही.

४) प्रत्येक स्तरावर बक्षिसासाठी ग्रामपंचायतीची निवड करताना क्र. १ चे बक्षिस शक्यतोवर विभागून देऊ नये. समान गुण मिळालेच तर विशेष पारितोषिकांसाठीच्या तीन मुद्यात ज्या गावाला जास्त गुण असतील त्यांची क्रमांक १ साठी निवड करून समान गुण प्राप्त दुसऱ्या ग्रामपंचायतीला द्वितीय क्रमांक द्यावा व त्यांच्या पुढच्या क्रमांकाच्या ग्रामपंचायतीला तृतीय क्रमांक देतात. तसेच प्रत्येक स्तरावर उत्कृष्ट ग्रामपंचायत निवडताना जर २ क्रमांकाच्या निवडीसाठी दोन ग्रामपंचायतींना द्वितीय क्रमांक देतात व त्यांच्या पुढच्या क्रमांकाच्या ग्रामपंचायतीला तृतीय क्रमांक देतात. तसेच प्रत्येक स्तरावर उत्कृष्ट ग्रामपंचायत निवडताना जर २ क्रमांकाच्या निवडीसाठी दोन ग्रामपंचायतींना समान गुण मिळाले तर क्र. २ व क्र. ३ च्या बक्षिसाची रक्कम एकत्रित करून ती दोन्ही गुणानुक्रमे २ वरील ग्रामपंचायतींना समान विभागून देतात. या परिस्थितीत क्र. ३ चे बक्षिस राहणार नाही.

५. **अ)** बक्षिसपात्र ग्रामपंचायतीपैकी विभागस्तरापर्यंत पहिल्या आलेल्या ग्रामपंचायतीच पुन्हा पुढील वर्षी केवळ पुढल्यास्तरावरील स्पर्धेतील बक्षिसासाठीच पात्र असतील. मात्र आधीच्या वर्षी प्रथम आलेल्या ग्रामपंचायतीने पुढील वर्षात, आधीच्या वर्षी बक्षिस मिळालेल्या स्तरापासून पुढील स्तरावरील स्पर्धेत सहभागी न होता पहिल्या फेरीपासून म्हणजेच जिल्हा परिषद मतदारसंघस्तरीय तपासणी फेरीपासून स्पर्धेत सहभागी होणे आवश्यक आहे. तसेच तत्पुर्वी दिनांक २ ऑक्टोंबर ते ३१ ऑक्टोंबर या कालावधीत नेमून दिलेल्या मोहिमा राबविणे आवश्यक आहे.

**ब)** राज्यस्तरावर अभियानांतर्गत गुणानुक्रमे आलेल्या ३ ग्रामपंचायतीपुढील १० वर्षे व पंचायत समित्यापुढील पाच वर्षे व जिल्हा परिषदांपुढील तीन वर्षे पुन्हा कोणत्याही स्तरावरील स्पर्धेत सहभागी होऊ शकणार नाहीत. मात्र त्या अभियानात स्वत: सहभागी होऊ शकतात व इतर ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदांना मार्गदर्शन करू शकतात.

**क)** पंचायत समिती, जिल्हा स्तरावर व विभागीय स्तरावर यापूर्वीच्या वर्षातील

अभियानातील मिळालेल्या क्रमांकाच्या वरचा क्रमांक चालू वर्षीच्या अभियानात त्याच स्तरावर मिळाल्यास अशा ग्रामपंचायतीना यापूर्वीच्या वर्षातील अभियानात मिळालेल्या बक्षिसाची रक्कम चालू वर्षी मिळालेल्या बक्षिस रकमेतून वजा करून उर्वरित रक्कम बक्षिसरूपाने देण्यात येते.

ड) मात्र वरील क मध्ये नमूद ग्रामपंचायतींना त्याच स्तरावर यापुर्वीच्या वर्षातील अभियानात मिळालेला क्रमांक किंवा त्यापेक्षा निम्न क्रमांक मिळाल्यास असे बक्षिस, त्या ग्रामपंचायतीला न देता पोटनियम ६ (अ) च्या अधीन राहून मिळणाऱ्या रकमेएवढे बक्षिस गुणानुक्रमांकावरील पुढील ग्रामपंचायतीला देण्यात येते.

इ) मात्र वरील क मध्ये नमूद ग्रामपंचायतींना त्याच स्तरावर, यापूर्वीच्या वर्षातील अभियानातील क्रमांकच पुन्हा चालू वर्षातील अभियानात मिळाल्यास, सदर ग्रामपंचायतीस बक्षिसाची रक्कम मिळणार नाही. परंतु यापूर्वीच्या वर्षातील अभियानात त्यांना त्याच क्रमांकाचे बक्षिस विभागून मिळालेले असल्यास चालू वर्षी फरकाची रक्कम त्यांना देण्यात येते. (मात्र ज्या ग्रामपंचायती सतत तीन वर्षे एखाद्या स्तरावरील तोच क्रमांक मिळवित असेल तर चौथ्या वर्षी ती ग्रामपंचायत त्या क्रमांकाच्या बक्षिसाची रक्कम मिळण्यास पात्र ठरेल.)

फ) मात्र या सर्व ग्रामपंचायतींना बक्षिस म्हणून प्रमाणपत्र देण्यात येते.

६) या अभियानास लाभलेला प्रतिसाद व लोकसहभाग कायम रहावा तसेच स्वच्छतेस / विकास कामास आलेली गती कायम रहावी यास्तव ग्रामपंचायतींनी केलेल्या कामाचे मुल्यांकन नि:पक्षपातीपणे होणे आवश्यक आहे. यासंदर्भात प्रत्येक स्तरावरील तपासणी समितीतील अधिकारी पदाधिकारी यांची जबाबदारी महत्त्वाची आहे. त्यांच्या अनुपस्थितीमुळे अचूक मुल्यांकन व योग्य ग्रामपंचायतींची निवड होण्यात अडचणी निर्माण होतात. यास्तव, तपासणी समितीतील किमान २/३ सदस्यांनी तपासणीसाठी हजर राहणे आवश्यक आहे. अगदीच अपरिहार्य परिस्थित जिल्हा परिषद मतदार संघस्तरीय तपासणी समिती व पंचायत समितीस्तरीय तपासणी समितीतील ज्या पदाधिकाऱ्यांना व अधिकाऱ्यांना

तपासणीसाठी हजर राहणे शक्य नसेल त्यांनी अनुक्रमे त्यांच्या जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांची व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची पुर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. अन्यथा ते कारवाईस पात्र ठरतात.

७) तसेच ज्या जिल्हापरिषद अध्यक्षांना, जिल्हा स्तरीय तपासणीसाठी हजर राहणे शक्य नसेल त्यांनी मा. मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांची तर ज्या मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय आयुक्तांना तपासणीसाठी हजर राहणे शक्य नसेल त्यांनी मुख्य सचिवांची पुर्न:परवानगी घेणे आवश्यक असते. अन्यथा मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय आयुक्त हे सदर तपासणीस न गेल्यामुळे शासनाने त्यांना नेमुन दिलेल्या कर्तव्यात त्यांनी कसुर केल्याचे गृहित धरून पुढील कारवाई करण्यात येते. तसेच जे जिल्हापरिषद अध्यक्ष, मा. मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांची पूर्व परवानगी घेतल्याविना तपासणीसाठी गैरहजर राहतील त्यांना, शासनाने नेमून दिलेल्या विकास कामाच्या कर्तव्यात त्यांनी कसूर केल्याचे गृहित धरून त्यांना जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील नियम ५० अन्वये कारवाई करण्यात येते.

**१०) तपासणी संदर्भात मार्गदर्शक सूचना :**

या अभियानाची अंमलबजावणी अधिकाधिक यशस्वीपणे व्हावी, यासाठी गावांची निवड नेमून दिलेल्या निकषानुसार नि:पक्षपातीपणे व्हावी यासाठी तपशिलवार मार्गदर्शक सूचनाही संबंधितांना देण्यात येतात.

**११) मुल्यमापनाची पद्धत :**

**अ) संत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेअंतर्गत ग्रामपंचायतींची निवड.**

| मुद्दा क्र. | विषय | कमाल गुण | मिळालेले गुण |
|---|---|---|---|
| १ | पाणी व्यवस्थापन | ३० | |
| २ | सांडपाणी व्यवस्थापन | १५ | |
| ३ | शौचालय व्यवस्थापन | ३० | |
| ४ | घनकचरा व्यवस्थापन | २० | |
| ५ | घर व परिसर स्वच्छता | २० | |
| ६ | वैयक्तिक स्वच्छता | १० | |
| ७ | आरोग्य, शैक्षणिक व लोकशिक्षण | १० | |
| ८ | अपारंपारिक ऊर्जा व्यवस्थापन | १५ | |
| ९ | कुटुंबकल्याण | २० | |
| १० | लोकसहभाग | २५ | |
| ११ | सामुहिक स्वयंपुढाकारातून नाविन्यपूर्ण उपक्रम | ५ | |
| | एकूण गुण | २०० | |

विषयानुरूप कमाल गुणांची विभागणी कशी करावी याचाही तपशील शासनाने तयार केला आहे.

१) सोबत दिलेल्या निकषानुसार मुल्यमापन करण्यासाठी तपासणी सूची देण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रत्येक राज्यस्तरावरील समित्यांच्या सदस्यांनी तपासणी करून उपस्थित असलेल्या प्रत्येक सदस्यांना स्वतंत्रपणे गुण घ्यावयाचे असतात.

२) वर दिलेल्या अनुक्रमांक एक प्रमाणे समिती सदस्यांनी दिलेल्या गुणांची बेरीज करून त्याला उपस्थित असलेले सदस्य संख्येने भागून जी सरासरी येईल तेवढे गुण त्या ग्रामपंचायतीला मिळतात.

३) मोठ्या लोकसंख्येच्या गावांना अभियान राबविण्यासाठी करावे लागणारे जादा प्रयत्न विचारात घेता त्यांना जादा गुण देणे आवश्यक आहे. यासाठी, उपरोक्त अनुक्रमांक दोन मध्ये दिलेल्या प्रक्रियेनंतर ग्रामपंचायतीला जे सरासरी गुण मिळतील, त्या सरासरी गुणांवर लोकसंख्येनुसार टक्केवारीने द्यावयाचे जादा गुण काढून ते मुळ गुणांत अंतर्भुत करून अंतिम मिळालेल्या गुणांची टक्केवारी खालीलप्रमाणे काढली जाते.

- १००० लोकसंख्येपर्यंतच्या ग्रामपंचायती - प्रत्यक्ष मिळालेले गुण
- १००१ ते ३००० पर्यंत लोकसंख्येच्या ग्रामपंचायती - प्रत्यक्ष मिळालेले गुण + त्या गुणाच्या २%
- ३००१ ते ६००० पर्यंत लोकसंख्येच्या ग्रामपंचायती - प्रत्यक्ष मिळालेले गुण + त्या गुणाच्या ३%
- ६००१ पेक्षा जादा लोकसंख्येच्या ग्रामपंचायती - प्रत्यक्ष मिळालेले गुण + त्या गुणाच्या ५%

यामुळे मोठ्या ग्रामपंचायतींना कराव्या लागणाऱ्या जादा प्रयत्नांना योग्य तो न्याय मिळतो.

**ब) विशेष पुरस्कारासाठी ग्रामपंचायतींची निवड :**

जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर द्यावयाच्या विशेष पुरस्कारासाठी अभियानांतर्गत द्यावयाच्या पारितोषिकासाठी निवडलेल्या ग्रामपंचायती व्यतिरिक्त तपासलेल्या उर्वरित ग्रामपंचायतीमधून विशेष पुरस्कार द्यावयाच्या ग्रामपंचायतींची निवड करण्यात येते. जिल्हा स्तरावरील या तीन विशेष बक्षिसांसाठी तीन ग्रामपंचायतींची निवड, नेमून दिलेल्या दुसऱ्या जिल्ह्याच्या जिल्हा स्तरीय तपासणी समितीद्वारे केली जाते. तसेच विभाग स्तरावर, अशी निवड नेमून दिलेल्या दुसऱ्या विभाग स्तरीय तपासणी समितीद्वारे केली जाते. राज्यस्तरावरील या तीन विशेष बक्षिसांसाठी ग्रामपंचायतींची निवड राज्यस्तरीय तपासणी समितीतर्फे करण्यात येते. या तिन्ही स्तरावर या पारितोषिकासाठी निवड करताना तपासलेल्या उर्वरित ग्रामपंचायतीपैकी कुटुंबकल्याण या विषयात सर्वाधिक गुण मिळालेल्या ग्रामपंचायतींची

निवड, स्व. आबासाहेब खेडकर पुरस्कारासाठी, पाणी व्यवस्थापन या विषयात सर्वाधिक गुण मिळालेल्या ग्रामपंचायतींची निवड स्व. वसंतराव नाईक पुरस्कारासाठी, तसेच सामाजिक एकता विषयावर सर्वाधिक गुण मिळालेल्या ग्रामपंचायतींची निवड डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कारासाठी करण्यात येते.

या निवडीसाठी पुढील पद्धतींचा अवलंब केला जातो.

**१) जिल्हा स्तरावरील विशेष बक्षिसांसाठी :**

अ) जिल्ह्यातील प्रत्येक पंचायत समितीतील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेतील प्रथम दोन क्रमांकाच्या ग्रामपंचायतींची यादी केली जाते. (उदा. एका जिल्ह्यात १५ पंचायत समित्या असतील तर १५ बाय २ याप्रमाणे ३० ग्रामपंचायतींची यादी केली जाते.)

ब) त्यातून ६०% पेक्षा कमी गुण मिळालेल्या ग्रामपंचायती वगळण्यात येतात. (उदा. एकूण ३० पैकी ४ ग्रामपंचायतींना ६०% पेक्षा कमी गुण असतील त्यांना वगळून उर्वरित २६ ग्रामपंचायतींची यादी केली जाते.)

क) या ग्रामपंचायतींतून जिल्हा स्तरावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेतील बक्षिस मिळालेल्या३ ग्रामपंचायती वगळण्यात येतात. (उदा. उपरोक्त २६ ग्रामपंचायतीमधून जिल्हा स्तरावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेतील बक्षिस मिळालेल्या ३ ग्रामपंचायती असतील तर या तीन ग्रामपंचायती वगळण्यात येतात.)

जर ही बक्षिसे विभागून दिलेली असतील किंवा प्रथम तीन क्रमांकाच्या बक्षिसे मिळालेल्या एखाद्या ग्रामपंचायतीस आधीच्या वर्षात बक्षिस मिळाले असल्याने, चालू वर्षात बक्षिसाची रक्कम त्या ग्रामपंचायतीस न देता पुढील गुणानुक्रमांकाच्या ग्रामपंचायतीस बक्षिसाची रक्कम देण्यात आली असेल तर अशा बक्षिस रक्कम मिळालेल्या सर्व ग्रामपंचायती वगळण्यात येतात.

ड) उपरोक्त ग्रामपंचायती वगळून उर्वरित ग्रामपंचायतीपैकी कुटुंबकल्याण,

सामाजिक एकता (लोकसहभाग) आणि पाणी व सांडपाणी व्यवस्थापन या विषयात सर्वाधिक गुण मिळालेल्या ग्रामपंचायतींना अनुक्रमे स्व. आबासाहेब खेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्व. वसंतराव नाईक पुरस्कार देण्यात येतात.

**२) विभाग स्तरावरील बक्षिसासाठी :**

प्रत्येक जिल्ह्यातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेतील प्रथम दोन क्रमांकाच्या ग्रामपंचायतींची यादी करून नंतर वरील पद्धतीचा अवलंब करून विभाग स्तरावरील विशेष बक्षिसासाठी ग्रामपंचायतींची निवड केली जाते.

**३) राज्यस्तरावरील बक्षिसासाठी :**

प्रत्येक विभागातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, स्वच्छ ग्राम स्पर्धेत तपासलेल्या ग्राम पंचायतीपैकी, राज्यस्तरावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत बक्षिस मिळालेल्या ग्राम स्पर्धेत बक्षिस मिळालेल्या ग्राम पंचायती वगळून उर्वरित ग्रामपंचायतीपैकी ज्या ग्रामपंचायतींना ज्या विषयात सर्वात जास्त गुण मिळाले आहेत त्या ग्रामपंचायतींची विशेष पुरस्कारासाठी निवड करण्यात येते.

## क) राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ जिल्हा परिषद व स्वच्छ पंचायत समिती स्पर्धेअंतर्गत जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांची निवड :

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानात, जास्तीत जास्त पंचायत समिती व जिल्हा परिषदांनी भाग घेऊन आपल्या कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त ग्रामपंचायतींना, ग्रामीण भाग लोकसहभागातून स्वच्छ करण्यासाठी उद्युक्त करावे व त्यायोगे स्वच्छतेची परंपरा हळूहळू निर्माण करावी या दृष्टीकोनातून या अभियानांतर्गत सन २००१-०२ पासून जिल्हापरिषद व स्वच्छ पंचायत समिती स्पर्धा घेण्यात येत आहे.

आता पंचायत समित्या व जिल्हा परिषदांच्या निवडीबाबत विहित केलेल्या गुणांकन पद्धतीनुसार प्रत्येक विभागातील सर्वोत्कृष्ट पंचायत समितीची व सर्वोत्कृष्ट परिषदेची निवड, त्याच विभागाच्या विभागस्तरीय तपासणी समितीमार्फत करण्यात येते. तसेच मात्र,

राज्यस्तरावरील तीन सर्वोत्कृष्ट पंचायत समित्या व तीन सर्वोत्कृष्ट जिल्हा परिषदांची निवड, विहित केलेल्या गुणांकन पद्धतीनुसार, राज्यातील सर्व जिल्हा परिषदा व सर्व पंचायत समित्यांमधून राज्यस्तरीय समितीमार्फत करण्यात येते. याबाबतचे निकष व निवडपद्धती स्वतंत्रपणे कळविण्यात येतात.

## १२) जिल्हा स्तरावर प्रथम आलेल्या ग्रामपंचायतीस यशवंत ग्राम तसेच स्वयंसेवी संस्थेचा दर्जा :

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छता ग्राम स्पर्धा स्पर्धेत पारितोषिक मिळविलेल्या ग्रामपंचायतींमध्ये निर्माण झालेली स्वच्छताविषयक स्थिती कायम टिकून राहिली तरच या स्पर्धेच्या मागील मूळ हेतू यशस्वी होईल व ग्रामीण जनतेस या स्वच्छतेचे दृश्य व अदृश्य परिणाम सुद्धा हळूहळू जाणवू लागतील. हे गाव पुन्हा अस्वच्छतेच्या गर्तेत जाणार नाही. तसेच गाव स्वच्छ होण्यासाठी या गावाने घेतलेले परिश्रम, नाविन्यपूर्ण कल्पना, स्थानिक कौशल्य व वस्तुंच्या समर्पक वापराचे तंत्र आजुबाजूच्या परिसरातील गावांनाही चालना देणारे व मार्गदर्शक ठरावेत तसेच बक्षिसपात्र गावातील स्वच्छतेची स्थिती टिकून रहावी म्हणून राष्ट्र संत तुकडोजी महाराज ग्राम स्वच्छता स्पर्धेअंतर्गत प्रत्येक जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळविलेल्या ग्रामपंचायतींना ''यशवंत ग्राम'' असे नामाभिधान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच या ग्रामपंचायतींनी आपले गाव स्वच्छ करण्यासाठी घेतलेले परिश्रम आजुबाजूच्या परिसरातील इतर गावांनाही मार्गदर्शन ठरावेत व इतर गावांनी सुद्धा स्वच्छतेची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा म्हणून या ग्रामपंचायतींना सेवाभावी संस्थेचा दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

या ग्रामपंचायतींनी संबंधित जिल्हा परिषदेच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यांतील इतर गावातील पदाधिकारी व उत्साही कार्यकर्त्यांच्या भेटी व मार्गदर्शक शिबीरे आपल्या गावात आयोजित करावीत, तसेच परिसरातील इतर गावांमध्ये प्रशिक्षित मनुष्यबळ पाठवून अन्य गावात ज्या क्षेत्रात सुधारणा करण्यास वाव आहे त्याबाबत मार्गदर्शन करावे, यासाठी

आपल्या ग्रामपंचायतीअंतर्गत सक्षम मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी व क्षमता वाढविण्यासाठी मनुष्यबळ विकास कार्यक्रम जिल्हा परिषद व इतर सेवाभावी संस्थेच्या सहकार्याने राबवावे. या ग्रामपंचायतींना जागतिक बँक अर्थसहाय्यीत पाणीपुरवठा व स्वच्छतेचा जलस्वराज्य व केंद्र शासनाच्या संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत सेवाभावी संस्थाकडून अभिप्रेत कार्यक्रम घेण्यासाठी नियुक्ती करता येईल.

या संदर्भात जिल्हा परिषद, पंचायत समिती व अन्य गावांशी संपर्क साधणे व भेटीचे/प्रशिक्षणाचे कालबद्ध कार्यक्रम आखणे ही जबाबदारी ग्रामपंचायत समितीची राहील व यानुसार अंमलबजावणीची जबाबदारी संबंधित यशवंत ग्रामचे सरपंच, अभियान समितीचे अध्यक्ष व ग्रामसेवक यांची राहिल. ग्रामसभेमध्ये अशा केलेल्या कामाचा वेळोवेळी आढावा सादर करण्यात यावा.

संबंधित जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) तसेच संबंधित पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी याबाबत बक्षिसपात्र ठरलेल्या ग्रामपंचायतीच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या वेळोवेळी बैठका व कार्यशाळा घेऊन आवश्यक ते मार्गदर्शन व सुचना करतात.

विभागीय आयुक्तांचे अध्यक्षतेखालील समिती / समितीतील सदस्य त्यांचे विभागातील यशवंत ग्रामचे वेळोवेळी तपासणी करून मुल्यमापन करतील व गावांचा यशवंत ग्राम दर्जा कायम ठेवणेबाबत निर्णय घेतील. स्वच्छता स्तर घरसला असे वाटल्यास त्यांचा यशवंत ग्राम दर्जा काढून घेण्याची शिफारस शासनास करतील. शासन त्यावर संबंधित गावाचे मत ऐकून घेऊन निर्णय देईल व तो निर्णय अंतिम असतो. या संदर्भात कोठेही अपील करता येणार नाही. तसेच संबंधित पंचायत समिती व जिल्हा परिषदेचे अधिकारी वेळोवेळी सदर गावांना भेटी देऊन स्वच्छतेच्या दर्जाबाबतची तपासणी करतील व त्याबाबचा आपला अहवाल विभागीय आयुक्तांना करतील.

### १३) बक्षिस रक्कमेचा विनियोग :

१) संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाअंतर्गत प्रत्येक स्तरावर वितरीत

केलेल्या बक्षिस रकमेचा विनियोग संबंधित ग्रामपंचायतींनी प्रामुख्याने आपल्या क्षेत्रातील विकास कामासाठी करणे आवश्यक आहे. या दृष्टीने बक्षिस रकमेच्या विनियोगाबाबतच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

अ) बक्षिसाच्या रकमेतून विविध उपक्रमांसाठी खर्च करण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार ज्या ग्रामपंचायतीला बक्षिस मिळाले आहे त्या ग्रापंचायतीच्या ग्रामसभेला असतील. याबाबतचा निर्णय घेण्यासाठी विशेष ग्रामसभा बोलावून त्यासभेत विनियोगाबाबत निर्णय घेण्यात येतो.

ब) बक्षिस रकमेपैकी कमाल २% पर्यंत खर्च बक्षिस समारंभासाठी आयोजित करावयाच्या कार्यक्रमावर अनुषंगीक बाबींवर खर्च करता येतो.

क) एकूण बक्षिस रकमेच्या ५% पर्यंत स्वच्छतेशी निगडीत बाबीच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात ग्रामसभेच्या निर्णयानुसार खर्च करता येतो.

ड) बक्षिसाच्या एकूण रकमेच्या ५% पर्यंत खर्च ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय व कार्यालयीन बाबींसाठी ग्रामसभेच्या निर्णयानुसार करता येतो.

इ) बक्षिस रकमेच्या कमाल १५% पर्यंत खर्च ग्रामपंचायतीतील रहिवाश्यांसाठी वैयक्तिक लाभाच्या योजनेसाठी खर्च करता येतो. असा वैयक्तिक लाभ, महिला, विद्यार्थी, युवक व ग्रामस्वच्छता योजनेत उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामस्थांना देण्याचा निर्णय ग्रामसभा घेऊ शकते. वैयक्तिक लाभाच्या योजनेत ग्राम स्वच्छतेशी निगडीत बाबी जसे की, पिण्याचे पाणी शुद्धता तपासणी उपकरणे पुरविणे, सफाई उपकरणे, परसबागेसाठी बी-बियाणे पुरविणे, स्वच्छता ठेवण्यासाठी वस्तु अशा तत्सम् स्वरूपाचे असावे. शक्यतो वैयक्तिक लाभ रोख रकमेत देण्याचे टाळावे. रोख रकमा देण्याचा निर्णय ग्रामसभेने घेतल्यास तो एकूण १५% मर्यादेच्या आत प्रति कुटुंब रु. ३००/- पेक्षा जास्त असू नये.

उ) उर्वरित रक्कम ग्रामपंचायतीतील स्वच्छतेशी निगडीत सार्वजनिक कामाकरिता खर्च करण्यात येते. यात पाणी शुद्धता तपासणी उपकरणे, कीट खरेदी, ड्रेनेज (अंतर्गत व

रस्त्याच्या बाजूची) कचराकुंड्या, पाणी स्त्रोत स्वच्छता, सार्वजनिक शौचालये बांधकाम दुरूस्ती/देखभाल इ. तत्सम् बाबींचा समावेश केला आहे.

ग्रामसभेने घेतलेल्या निर्णयानुसार अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतींच्या कमिटीची राहिल, ग्रामसभेच्या निर्णयानुसार खर्च करून त्याचे हिशोब ठेवणे व ग्रामसभेला अहवाल सादर करणे, आणि संबंधित यंत्रणांना याबाबत आवश्यक व इतर माहिती सादर करण्याची जबाबदारी सरपंच व ग्रामसेवक यांची राहिल.

जिल्हा परिषदांनी या सूचना, बक्षिस मिळविणाऱ्या ग्रामपंचायतींच्या वेळोवेळी निदर्शनास आणाव्यात. तसेच या सूचनांनुसार ग्रामपंचायती खर्च करीत आहेत, याची कालबद्ध तपासणी संबंधित गटविकास अधिकारी, संबंधित जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) व मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच त्यांनी यासाठी नियुक्त केलेले अन्य अधिकारी यांनी करावी. ज्या प्रकरणात या सुचनांचे उल्लंघन झाले असल्याचे आढळून येईल त्या प्रकरणात संबंधित ग्रामपंचायतींचे सरपंच व ग्रामसेवकावर आवश्यक ती कारवाई तातडीने करावी व त्याचा अहवाल शासनास सादर करतात. संबंधित जिल्हापरिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी याबाबत बक्षिसपात्र ठरलेल्या ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेस हजर राहून आवश्यक ते मार्गदर्शन व सूचना करतात.

२) राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ जिल्हा परिषद व स्वच्छ पंचायत समिती स्पर्धेअतर्गत जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांना मिळालेल्या बक्षीस रकमेचा विनियोग-

राज्यातील गुणानुक्रमे सर्वात स्वच्छ प्रथम तीन जिल्हापरिषदांना अनुक्रमे रु. १५, १० व ५ लाखाची रोख पारितोषिके शासनातर्फे देण्यात येतात. तसेच राज्यातील गुणानुक्रमे सर्वात स्वच्छ प्रथम तीन पंचायत समित्यांना अनुक्रमे रु. ७.५०, ५ व २.५० लाखाची रोख पारितोषिके शासनातर्फे देण्यात येतात. या पारितोषिकाच्या रकमेचा विनियोग जिल्हापरिषदांनी / पंचायत समित्यांनी कोणकोणत्या बाबीसाठी करावा याबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहेत.

अ) पारितोषिकाची रक्कम प्रथम जिल्हा परिषदेच्या किंवा पंचायत समितीच्या स्वनिधीत जमा करावी. या रकमेतून खर्च करण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार, ज्या जिल्हा परिषदेला तथा पंचायत समितीला पारितोषिक मिळाले आहे. त्या जिल्हा परिषदेला तथा पंचायत समितीला असतात. या पारितोषिकाच्या रकमेतून खर्च करण्याबाबतचा निर्णय सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने घ्यावा लागतो. निर्णय घेण्यासाठी प्रसंगी विशेष सभा बोलावता येते.

ब) या रकमेतून कोणत्याही परिस्थितीत वेतन व वेतनेतर बाबी तसेच दैनंदिन स्वरूपाचा सादिल खर्च करता येत नाही.

क) जिल्हा परिषदेस किंवा पंचायत समितीस सदर पारितोषिक मिळण्यासाठी ज्या पदाधिकारी, कर्मचारी इ. चे परिश्रम कारणीभूत असतात, त्यांना रोख पारितोषिके देऊन त्यांचा सन्मान करतात. ही निवड सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने करावी लागते. त्यासाठी पारितोषिकाच्या एकूण रकमेपैकी जास्तीत जास्त ५% रक्कम खर्च करता येते. मात्र वैयक्तिक बक्षिसाची रक्कम जिल्हा परिषद स्तरावर रु. १०००/- पेक्षा व पंचायत समितीस्तरावर रु. ५००/- पेक्षा अधिक असू नये.

ड) जिल्हा परिषदेच्या / पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रात ज्या शाळा, बालवाड्या / अंगणवाड्या, पशुवैद्यकीय दवाखाने, प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच अन्य शासकीय / निमशासकीय कार्यालये यांनी या अभियानात उल्लेखनीय कामगिरी बजावली असेल त्यांचा पारितोषिक देऊन सन्मान करावा लागतो. ही निवड सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने करावी लागते. यासाठी सदर पारितोषिकाच्या रकमेतुन जास्तीत जास्त १०% पर्यंत खर्च करावा लागतो. मात्र, सदर बक्षिसाची रक्कम, जिल्हा परिषद स्तरावर रु. १०००/- पेक्षा व पंचायत समिती स्तरावर रु. ५००/- पेक्षा अधिक असू नये.

इ) एकूण पारितोषिकाच्या रकमेच्या ५% पर्यंत स्वच्छतेशी निगडीत बाबीच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी तसेच अभियानाच्या अंमलबजावणीसाठी, जिल्हा परिषदेच्या किंवा पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रात सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार खर्च करता येतो.

उ) एकूण पारितोषिकाच्या रक्कमेच्या १५% पर्यंत खर्च, जिल्हा परिषदेच्या / पंचायत समितीच्या कार्यालयीन सुधारणा, संगणकीकरण, इमारतीची डागडुजी यासाठी सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार करता येतो.

ऊ) एकूण पारितोषिकाच्या रकमेच्या कमाल १०% पर्यंत खर्च जिल्हा परिषदेच्या किंवा पंचायत समितीच्या कार्यालयीन व परिसरातील स्वच्छता व सजावटीसाठी सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार खर्च करता येतो.

ए) जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती कार्यक्षेत्रातील शासकीय किंवा निमशासकीय कार्यालये किंवा संस्था पूर्ण कार्यक्षमतेने काम करण्यास चालना देण्यासाठी त्यांच्यात विविध स्पर्धांचे आयोजन करावे. स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे देण्यासाठी पारितोषिकांच्या रकमेच्या ५% रक्कम खर्च करता येईल.

ऐ) उर्वरित ५०% रक्कम जिल्हा परिषदेच्या किंवा पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रात स्वच्छतेशी निगडीत सार्वजनिक कामाकरिता खर्च करण्यात येते. मात्र यातून देखभाल दुरूस्ती वरील खर्च न करता स्थावर स्वरूपाची कामे करण्यात येतात. यातून प्राथम्याने शासकीय किंवा निमशासकीय संस्थांची कार्यालये, एस.टी. स्टँड, शाळा, गर्दीची सार्वजनिक ठिकाणे अशा ठिकाणी सार्वजनिक शौचालयाची सुविधा उपलब्ध करून द्यावी लागतात.

सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयानुसार अंमलबजावणी करण्याची जबाबदारी जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा पंचायत समितीचे मुख्य गटविकास अधिकारी यांची राहते. सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार खर्च करून त्याचे हिशोब ठेवणे व सर्वसाधारण सभेला अहवाल सादर करणे, आणि संबंधित यंत्रणांना याबाबत आवश्यक व इतर माहिती सादर करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेतील उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मार्गदर्शन अधिक प्रभावी ठरते.

## 'यशवंत ग्राम' योजना :

**शासन निर्णय :**

१) संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात जिल्ह्यात ज्या ग्रामपंचायती प्रथम येतात त्यांना यशवंत ग्रामदर्जा देऊन त्यांना सेवाभावी संस्था म्हणून काम करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. अशा यशवंत ग्रामपंचायतीनी परिसरातल्या इतर ग्रामपंचायतींना त्यांच्या गावात बोलावून अथवा संबंधित गावात जाऊन प्रबोधन करावे व त्यांनाही आपल्या गावाप्रमाणेच स्वच्छ होण्याचा संदेश द्यावा असे अपेक्षित आहे. दुसऱ्या गावांसाठी सेवाभावी संस्था म्हणून काम करावयाचे असल्यास या यशवंत ग्राम गावांना विशेष प्रकारचे प्रशिक्षण देण्याची तरतूद केंद्र पुरस्कृत संपूर्ण स्वच्छता अभियान कार्यक्रमाचा व संत गाडगेबाबा अभियानांतर्गतही करण्यात आली असून त्यासाठी क्षमतावर्धन प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

२) राज्यातील सर्व जिल्ह्याच्या ग्रामीण भागात राबविण्यात येणाऱ्या केंद्र पुरस्कृत संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत शौचालय बांधकाम, सांडपाणी व्यवस्थापन, वैयक्तिक स्वच्छता विषयक बाबी ग्रामस्थांना समजावून सांगाव्यात व त्यांना प्रवृत्त करावे, त्यांची क्षमता बांधणी करावी म्हणून प्रत्येक जिल्ह्याच्या संपूर्ण प्रकल्पाच्या किमान १५% निधी राखून ठेवला आहे. यामध्ये सेवाभावी संस्थांची नियुक्ती करून ग्रामस्थांचे प्रबोधन करावे व त्याचे प्रशिक्षण करावे अशी तरतूद आहे.

३) केंद्र पुरस्कृत संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने निधी थेट जिल्हा परिषदांनी उघडलेल्या स्वतंत्र बँक खात्यात जमा केला असून मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली सर्व संबंधित अधिकाऱ्यांची एक स्वतंत्र समिती या कार्यक्रमाच्या अंमलाबजावणीसाठी गठीत करण्यात आली आहे. या समितीला संपूर्ण स्वच्छता अभियानात सर्व अधिकार देण्यात आलेले आहेत.

४) प्रत्येक जिल्ह्यास संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमाच्या मंजूर प्रकल्पापैकी जो १५% निधी जाणीव जागृतीसाठी राखून ठेवला आहे त्यातून यशवंत ग्राम गावांना इतर कोणत्याही

गावातील ग्रामस्थांनी दिलेल्या भेटीप्रसंगी अभ्यागतांच्या स्वागत, चहापाणी, प्रबोधन, साहित्य उपलब्ध करून प्रति गावासाठी रु. २०० पर्यंत मोबदला देण्यास मान्यता देण्यात येत आहे. हा निधी प्राप्त करण्यासाठी कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत याचीही सूची करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाने राबविलेल्या संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाअंतर्गत स्वच्छ अंगणवाडी व स्वच्छ प्राथमिक शाळा स्पर्धा घेतल्या. या अभियानात अंगणवाडी व शाळांचा सहभाग चांगल्या प्रकारे दिसून आलेला आहे. हा सहभाग आणखी व्यापक करण्यासाठी संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानात तालुका, जिल्हा, विभाग, व राज्य पातळीवर अंगणवाडी व प्राथमिक शाळेत प्रत्येक स्तरावर स्वच्छ अंगणवाडी व स्वच्छ प्राथमिक शाळेची निवड केल्यास अंगणवाडी व प्राथमिक शाळेत स्वच्छतेविषयी आणखी चांगले वातावरण तयार होऊ शकेल. अंगणवाडी व प्राथमिक शाळा ह्या संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात पात्र असलेल्या गावातूनच निवडल्या गेल्यास आपले गाव स्वच्छता अभियानांतर्गत सर्व स्तरावर पात्र असलेल्या ग्रामपंचायतीमधून स्वच्छ अंगणवाडी व स्वच्छ प्राथमिक शाळांची निवड करून त्यांना पारितोषिके देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**त्यानुसार शासनाने एक आदेश जाहीर केला आहे तो खालीलप्रमाणे -**

१) शासनाच्या निर्णयानुसार राज्यात संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत वर्ष २००५-०६ पासून पंचायत समिती, जिल्हा परिषद, महसूल विभाग व राज्य या प्रत्येक स्तरावर एका शासकीय अथवा जिल्हा परिषदेच्या मालकीच्या सर्वात स्वच्छ शाळेची व त्याच प्रत्येक स्तरावर सर्वात स्वच्छ अंगणवाडीची निवड करून त्यांना पारितोषिके देण्यात येतील.

**२) स्पर्धा व बक्षिसांची नावे :**

अ) सावित्रीबाई फुले स्वच्छ अंगणवाडी स्पर्धा

ब) सानेगुरूजी स्वच्छ प्राथमिक शाळा स्पर्धा

**३) निवडीची पद्धत :**

अ) प्रत्येक स्तरावर स्वच्छ अंगणवाडी व स्वच्छ शाळा स्पर्धा -

प्रत्येक जिल्हा परिषद मतदार संघातून संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानात गुणानुक्रमे आलेल्या तीन ग्रामपंचायतीतील सर्व प्राथमिक शाळा व अंगणवाडीमधून पंचायत समितीतील एका सर्वात स्वच्छ शाळा व एका सर्वात स्वच्छ अंगणवाडीची निवड केली जाईल.

ब) जिल्हा स्तरावर अंगणवाडी व स्वच्छ शाळा स्पर्धा -

प्रत्येक तालुक्यातून जिल्ह्यासाठी तपासलेल्या ग्रामपंचायतीमधील सर्व शाळा व अंगणवाडी मधून जिल्हा स्तरावरील सर्वात स्वच्छ शाळा व स्वच्छ अंगणवाडीची निवड केली जाईल.

क) विभागस्तर स्वच्छ अंगणवाडी व स्वच्छ शाळा स्पर्धा -

विभागातील प्रत्येक जिल्ह्यातील गुणानुक्रमे प्रथम व द्वितीय आलेल्या व ६०% पेक्षा जास्त गुण असलेल्या ग्रामपंचायतीमधून विभाग स्तरीय सर्वात स्वच्छ शाळा व स्वच्छ अंगणवाडीची निवड केली जाईल.

ड) राज्यस्तर अंगणवाडी व स्वच्छ शाळा स्पर्धा -

प्रत्येक विभागातून ६०% पेक्षा जास्त गुण मिळवून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्पर्धेसाठी पात्र ग्रामपंचायतीमधून राज्यातील सर्वात स्वच्छ प्राथमिक शाळा व स्वच्छ अंगणवाडीची निवड केली जाईल.

**४) बक्षिसाची रक्कम :**

**१) प्राथमिक शाळा**

अ) प्राथमिक समिती स्तरावरील सर्वात स्वच्छ एका प्राथमिक शाळेला रु. १०,०००/- चे रोख पारितोषिक दिले जाईल.

ब) जिल्हा स्तरावरील सर्वात स्वच्छ एका प्राथमिक शाळेला ५०,०००/- चे रोख पारितोषिक दिले जाईल.

क) विभाग स्तरावर सर्वात स्वच्छ एका प्राथमिक शाळेला रु. १,००,०००/- चे रोख पारितोषिक दिले जाईल.

ड) राज्य स्तरावरील सर्वात स्वच्छ एका प्राथमिक शाळेला ३,००,०००/- चे रोख पारितोषिक दिले जाईल.

**२) अंगणवाडी :**

अ) पंचायत समिती स्तरावरील सर्वात स्वच्छ अंगणवाडीला रु. ५,०००/- चे पारितोषिक दिले जाईल.

ब) जिल्हा स्तरावरील सर्वात स्वच्छ अंगणवाडीला रु. २५,०००/- चे पारितोषिक दिले जाईल.

क) विभाग स्तरावर सर्वात स्वच्छ अंगणवाडीला रु. ५०,०००/- चे पारितोषिक दिले जाईल.

ड) राज्यस्तरावर सर्वात स्वच्छ अंगणवाडीला रु. १,००,०००/- पारितोषिक दिले जाईल.

**५) तपासणी समित्या व पद्धत :**

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत त्या-त्या स्तरावरील तपासणी समित्याच या पारितोषिकांसाठी पात्र शाळांची व अंगणवाडीची तपासणी करून गुणानुक्रम देतील.

**६) तपासणीचे निकष :**

सदर तपासणीचे निकषही ठरविण्यात आले आहेत त्यानुसार तपासणी केली जाते.

**७) बक्षिसांचा विनियोग :**

अ) शाळेच्या बाबतीत ग्रामशिक्षण सुधार समिती, पालक, शिक्षक व विद्यार्थी यांच्या संयुक्त सभेत निर्णय घेऊन शाळेच्या विकास कामाकरीताच करेल. बक्षिसांपैकी २५% निधी शाळेची शैक्षणिक सहल, इतर स्वच्छ ग्रामपंचायतींना व शाळांना भेटी, विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा, परिक्षेत गुणानुक्रमे प्रथम आलेल्या सर्व वर्गातील विद्यार्थ्यांना बक्षिसे, पुढील शिक्षणासाठी मदत इ. करता येईल व उर्वरित रक्कम सामुहिक स्वरूपाच्या शालेय सुधारणांसाठी करता येईल.

ब) अंगणवाडी बक्षिसाचा विनियोग गावातील महिला विकास समिती व अंगणवाडी सेविका पालकांची सभा बोलावून त्यांच्या ठरावाप्रमाणे अंगणवाडीसाठीच केला जाईल.

क) हा खर्च ग्रामसभेला अथवा ग्राम सामाजिक लेखा परिक्षण समितीला वेळोवेळी सादर केला जाईल.

ड) शाळेला प्राप्त बक्षिसांची रक्कम ग्राम शिक्षण सुधार समितीच्या नावाने स्वतंत्र खाते उघडून ठेवली जाईल व ते खाते मुख्याध्यापक व ग्राम शिक्षण सुधार समितीचे अध्यक्षांकडून संयुक्तपणे चालविले जाईल. हिशोब ठेवण्याची जबाबदारी त्यांचीच असेल. अंगणवाडीला पाप्त पारितोषिकाची रक्कम अंगणवाडी सेविका व ग्राम महिला विकास समिती अथवा ती गठीत केली नसल्यास मुंबई ग्राम कायदा कलम ४९ अन्वये गठीत ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या अध्यक्षांचे संयुक्त बँक खात्यात ठेवली जाईल व तिचा विनियोग केला जाईल. हिशोब ठेवण्याचीही जबाबदारी त्यांचीच असेल.

**८) बक्षिसांचे वितरण :**

प्रत्येक स्तरावरील बक्षिसांचे वितरण संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेच्या बक्षिस वितरणासोबत व त्या वितरणाच्या कार्यक्रमात केला जाईल.

सदर प्रकरणात महाराष्ट्र शासनाची परिपत्रके, शासन निर्णय यांच्या आधारे संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचे स्वरूप स्पष्ट करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर पुढील प्रकरणात प्रस्तुत अभ्यासाची संशोधन समस्या आणि अवलंबिण्यात आलेल्या संशोधन पद्धतीच्या विविध पैलूचे वर्णन करण्यात आले आहे.

यापुढील प्रकरणात संशोधन समस्या आणि संशोधन पद्धती या विषयीचे विवेचन करण्यात आले आहे.

## संदर्भ सूची (REFERENCES) :


1. Chakraborty, A. K.: "Drinking Water Supply and Sanitation Decade in India", Indian Journal of Public Health, Vol. XXXV, No.1, Jan.-March, 1991, pp. 3-4.
2. D' Souza, A. L.: "The International Drinking Water Supply and Sanitation Decade", Yojana, June 1-15, 1985, pp.16-17.
3. Government of India: "Towards Total Sanitation and Hygiene: A challenge for India", Country Paper (2003), South Asian Conference on Sanitation, Dhaka, Bangladesh, held during 21st to 23rd October 2003, Department of Drinking Water Supply, Government of India: website: http://ddws.nic.in
4. Government of India: "Water Supply and Sanitation in India", Country Report (2002) Planning Commission, Government of India, website: http://planningcommission.nic.in
5. Government of Maharashtra: Department of Water Supply and sanitation, website: www.mahassd.gov.in
6. Government of Maharashtra: "Jalaswaraj: Pure Water and Clean Village" (in Marathi), A booklet published by the department of Water Supply and Sanitation, Mumbai.
7. Government of Maharashtra: Notification of the Department of Water Supply and Sanitation, Mumbai, regarding various competitions under Saint Gadagebaba Gram Swacchata Abhiyan, Government Resolution No. Abhiyan-2003/Pra. Kra.278/Water Supply 16, Mumbai, dated, 24th Sept. 2003.
8. Manikutty, S.: "Community Participation: Lessons from Experiences in Five Water and Sanitation Projects in India", Development Policy Review, Vol. 16, 1998, pp.373-404.
9. Santhanam, M. L.: "Community Participation in Rural Water Supply and Sanitation Programmes, Social Change, Vol. 19, No. 1, March 1989, pp.53-58.